म. ग्रं. सं. ठाणे
विषय — काव्य
सं. नं. ८७८

# अथश्रीएकनाथी भावार्थरामायण सारामृत प्रारंभः

किंमत चार आणे.

REFBK-0019509

# श्रीएकनाथस्वामींचें संक्षिप्त चरित्र.

सुमारें १४ व्या शतकांत **भानुदास** नांवाचा एक निःसीम भगवद्भक्त **पैठण** नगरींत राहत असे. हा देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण होता. यानें प्रत्येक एकादशीस पंढरीची वारी करून आपलें सर्व आयुष्य श्री पांडुरंगाच्या केवळ सप्रेम भक्तींत घालविलें. हा सगुण साक्षात्कारी होता. याच्या ठिकाणीं भगवद्भक्तीविषयीं इतकें व असें प्रेम होतें कीं, त्या प्रेमाच्याच प्रादुर्भावामुळें यानें एकदां विजयानगरच्या राजानें जुलूमानें नेलेली श्रीपांडुरंगाची पाषाणाची मूर्त्ति पंढरीस परत आपोआप नजातांयेतां आणिली. काय हें प्रेम ! पाषाण वस्तु जड अचल असतांही केवळ जीवाच्या प्रेमानें इच्छेप्रमाणें वर्तूं शकते. !! आणखी काय हवें ! असो. **भानुदासा**ला पुढें **चक्रपाणी** या नांवाचा मुलगा झाला. तोही तसाच भक्तिमान् व नीतिमान् होता. त्याच्या पोटीं **सूर्यनारायण** म्हणून एक पुत्ररत्न झालें. तेंही तसेंच. आणि यांस इ.स.१५४८म्हणजे शके१४७०या वर्षी **एकनाथ** हा मुलगा झाला **एकनाथा**चीं आईबापें लहानपणींच निवर्तल्यामुळें त्याचें पालनपोषण त्याच्या आजाआजीसच करावें लागलें, याचा स्वभाव बाळपणापासूनच शांत, सहनशील व सर्व अंशीं गोड असा होता. उपजतच साधन चतुष्टय संपन्न असें हें रत्न असल्यामुळें त्यास भगवद्भजन, पूजन, इत्यादि गोष्टींचा छंद वाणी बोबडी असतांच लागला. आधींच संत कुळांत जन्म, त्यांत अशी योग्य वृत्ति आणि तीहि बाळपणापासून, असें पाहून त्याच्या वयोवृद्ध आजाआजीस तो प्राणाहून प्रिय वाटे. त्याचें सौजन्य पाहून शेजारीपाजारी लोकांनींहि आनंद मानून त्या म्हाताऱ्या आजाआजींची धन्य धन्य करावी. त्याची बुद्धि ही इतकी तीक्ष्ण व चलाख होती कीं, थोड्याच दिवसांत नुसत्या अवलोकनानें तो धुळाक्षर, लेखनवाचन व व्यवहारापुरतें गणित शिकला. **चक्रपाणी**नें त्याच्या सहाव्या वर्षींच त्याचें मौंजीबंधन करून त्यास वेदाध्य-

यनास लाविलें. त्यास पुराणश्रवण व कथा करण्याची फारच हौस होती. श्रवण केलेल्या सर्व विषयांचें त्यानें एका निर्जन शिवालयांत जाऊन शांतपणें मनन करावें. असा एकाग्र चित्तानें तेथें विचार करोत असतां एके दिवशीं सिंहनादाप्रमाणें गंभीर आकाशवाणी झाली, '**एकनाथा**, देवगड मुक्कामीं **जनार्दनपंत** ह्मणून सत्पुरुष आहेत, त्यांस शरण जा ह्मणजे कृतकृत्य होशील.' एकाएकीं घडलेला हा दृष्टांत पाहून चकित झाला, आणि देवगडास जाऊन **जनार्दन** स्वामीच्या दर्शनाची तजवीज कशी होईल हा विचार करूं लागला. वृद्धांस टाकून जाणें ह्मणजे केवढी पंचाइत! मोठ्याच विवंचनेंत पडला. पण स्वात्महितापुढें हीं सर्व लटांबरें त्यास विसरावीं लागलीं. शेवटीं एकदाचा देवगडास जाऊन **जनार्दन**पंतास भेटला. गुरुभक्ति व संतसेवा याच्यासारखी करणारे विरळाच. या अशा भक्तीच्या प्रभावानेंच देव त्याचे इतके ऋणी झाले कीं नुसतें दर्शन देऊन देवाच्यानें त्यास ठकवितां येईना. कारण तो मुळींच निरिच्छ ह्मणून त्याच्या सेवेंत देवास प्रेमभुलीनुळें कित्येक वर्षें कृष्ण **श्रीखंड्या** या नांवानें रहावें लागलें. **जनार्दनपंत**ही त्याच्या सेवातत्परतेस पाहून चकित झाले. याचें उत राई कसें व्हावें हा त्यांस विचारच पडला. मग त्यास आपल्या गुरूचें (श्रीदत्तात्रयाचें) दर्शन करविलें. श्रीदत्तांनीं त्यास भागवतावर प्राकृत टीका करण्याविषयीं प्रसादवचन दिलें. नंतर **जनार्दन** स्वामीनीं काशी, बद्रिनाथ, उत्तरमानससरोवर, रामेश्वर प्रभृति तीर्थयात्रा करून येण्याची त्यास आज्ञा दिली,* सर्व तीर्थें करून आल्यावर त्यास गुरुवचनास्तव लग्न करावें लागलें. मग प्रातःस्नान, स्मार्तहोम, देवपूजा,

---

* नंतर नाशिक, त्रिंबक, इ० ठिकाणीं जातांना वाटेंत **चंद्रभटा**च्या घरीं त्यानें चतुःश्लोकी भागवतावर सुंदर टीका केली. त्या **चंद्रभटा**चें समाधिस्थान देवगडावर अद्याप आहे.

नैवेद्य, वैश्वदेव इ० गृहस्थाश्रमांतल्या नित्य क्रिया त्यान्च्या सतत चालल्याच असत. तो केवळ दीनवत्सल होता. कोणाचीही विनंती अमान्य कधींच करीत नसे. ह्मणून क्षेत्रस्थ ब्राह्मणांनीं त्याचा छळ करावा, पण पुनः त्यांची हरिकृपेनें खोड जिरावी, तरी त्यांचा दुष्ट स्वभाव त्यांस सोडीत नसे. **एकनाथांक**डून अनंत चमत्कार घडले. ते लिहावेसे वाटतात पण ग्रंथविस्तार होईल या भीतीनें एकदोनच सांगतों.

१ एकदां त्यानें पाषाणाच्या नंदीकडून गवत खाववून दाखविलें. आणि दुसऱ्यानें त्याच नंदीनें नाथाच्या वचनास्तव गंगेंत उडी टाकली. तो नदी आजपर्यंत तेथें आहे असें ह्मणतात.

२ **एकनाथा**न्या अलौकिक व प्रासादिक पुराणश्रवणासाठीं त्याचे घरीं दूरवरच्या लोकांचा थाट तिसरे प्रहरीं फारच जमत असे. तें अध्यात्मनिरूपण ऐकण्याकरितां साक्षात् **गंगा** अत्यंत लावण्ययुवतीरूपानें दररोज येत असे. तिचें मनमोहन रूप, सौंदर्य, पांढरें शुभ्र पातळ, काळा कुळकुळीत केशकलाप, सुंदर वेणीफणी व रत्नजडित अलंकारांची शोभा, हीं पाहून कुटिल व कामी पुरुष जागच्याजागींच थिजून जात. एके दिवशीं दोन मदांध पुरुषांच्या मनांत या स्त्रीवर झडप घालावी असें येऊन ते त्या दिवशीं श्रवण आटोपल्यावर लांडग्याप्रमाणें तिच्या मागोमाग चालले. तो तर शांतपणें गोदातीरापर्यंत गेली. इतक्यांत पतंगाप्रमाणें हे तिजवर झडप घालणार तोंच **गोदानदी** दुभांग होऊन ती स्त्री यांच्याकडे क्रोधमुद्रेनें पाहून अंतर्धान पावली !! नंतर दुसरे दिवशीं ही गोष्ट **एकनाथांस** कळतांक्षणींच त्यांनीं त्या दोघांस बोलावून तो भागीरथी होती असें सांगितलें. हें ऐकून त्यांस पश्चात्ताप होऊन ते तेथेंच नाथांस शरण गेले. **पैठणा**स कोठेंही पुराणश्रवण होत असलें तरी **गंगे**चा पाट ह्मणून एकपाट मांडण्याचा अद्याप प्रघात आहे.

असो. यांची अशी ही अनुपम्य निःसीम निष्ठा, चित्तैकाग्र्य व भगवत्साक्षात्काराच्या पुष्कळच गोष्टी ऐकून उपदेश घेण्याजोग्या आहेत.

यांचे पुढील ग्रंथ प्रसिद्ध आहेत.

१ एकनाथी भागवत, २ स्वात्मसुख (शुकाष्टकावर टीका), ३ चतुःश्लोकी भागवत टीका, ४ हस्तामलक, ५ आनंदलहरी, ६ रुक्मिणी-स्वयंवर, ७ भावार्थरामायण, ८ वसिष्ठानुभव.

हे सर्व ग्रंथ गोड, मार्मिक, साधित व प्रासादिक आहेत.

एकनाथी भागवताची पहिली पंचाध्यायी **पैठणास** संपवून बाकीचा ग्रंथ श. १४९५वांत कार्तिक शुद्ध ५चे दिवशीं **काशीमध्यें** यतीच्या मठांत समाप्त झाला. याचे अध्याय ३१ असून एकंदर ग्रंथ २०००० आहे. तेथील क्षेत्रस्थ ब्राह्मणांनीं या मराठी टीकेमुळें यांचा इतका छळ केला कीं तो ग्रंथ या दुर्जनांनीं **गंगेंत** टाकून दिला. त्यावेळीं साक्षात् **भागीरथीनें** आपल्या दिव्य कंकणयुक्त करसंपुटांत तो वरचेवर झेलून धरिला !! कांहीं तरी सिद्धि किंवा अद्भुत चमत्कार प्रकट केल्याविना हे मदोन्मत्त आंधळे जन साधुलोकांचा पिच्छा सोडीतच नाहींत, याविषयीं हें केवढें मासलेवाईक उदाहरण आहे वरें !!

शके १५०६त **एकनाथानें ज्ञानदेवांची** श्रीमद्भगवद्गीतेवरील टीका—ज्ञानेश्वरी—हा ग्रंथ गुप्त होता तो शोधून प्रसिद्ध केला.

भावार्थ रामायण हा ग्रंथ वाल्मिकीरामायणावर टीका होय. ह्यांत सप्तकांडें, २९७ अध्याय ३००० श्लोक, ३६३२९ ओव्या मिळून एकंदर ग्रंथसंख्या ३९३२९ आहे. **एकनाथांस** श्रीरामचंद्रजीनीं साक्षादर्शन देऊन हा ग्रंथ करण्यास प्रवृत्त केलें. युद्धकांडाचे ४४ अध्याय पर्यंत ग्रंथ तयार झाल्यावर प्रारब्ध संपून देह ठेवण्याची वेळ जवळ येऊन ठेपली. नंतर समर्थांच्या हुकुमाप्रमाणें **गावबा** या नांवाच्या एका मुक्याचे मस्तकीं आपला श्रीपद्महस्त ठेवून त्यास नाथांनीं आशीर्वाद दिला, समर्थांची कृपा मग काय कमी ! आपणा सारिखे करिती तात्काळ.

पुढें १५४६ फाल्गून वद्य ६ या दिवशीं पैठण येथेंच **एकनाथ** समाधिस्त झाले. ☞ पुढील ओव्यांवरील अंक अध्यायदर्शक आहेत.

श्रीगणेशायनमः ॥ श्रीसरस्वत्यैनमः॥श्रीसद्गुरवेनमः ॥ अथश्रीएकनाथीभावार्थरामायणसारामृत प्रारंभः ॥बाल कांड ॥ आदित्यान्वयसागरे दशरथःस्वातीजलं निर्मलं॥ कौसल्याजठराख्यशुक्तिपुटकेश्रीराममुक्ताफलम्॥तन्नीलं हृदये हरेण पदकं सम्यग्धृतं सोज्वलम् ॥ सच्छत्रंस्मरणेन शंकरसमं प्राप्नोति भाग्यं नरः॥१॥ सच्चिदानंदरूपाय जनार्दनस्वरूपिणे ॥ स्वप्रकाशाय शुद्धाय आचार्याय नमोनमः ॥ २ ॥ मायातीताय नित्याय मायागुणप्रकाशिने॥व्यक्ताव्यक्तस्वरूपायआचार्याय नमोनमः॥३॥ ज्ञानतेजें सतेज फरशु ॥ नित्य स्मरणाचाअंकुशु ॥ आनंद मोदकांचा सुरसु ॥ मुखीं देसी घांसु निजभक्तां ॥४॥आतां वंदूं सद्गुरु॥जो स्वानंदबोध वज्रपंजरु॥ज्याचे-

१९५०८

नि हा संसारु ॥होय सुखकरु तरुणोपाया॥२९॥फलंमूलं तथा तीर्थं प्रसादो राघवस्यच ॥ शीघ्रमेवानुसेवेत विलंबः कार्य नाशकः॥ शोधितां पश्यंति वोवरी ॥ तेथें न देखे निज सुंदरी॥ चढला परेच्या उपरी॥शुद्धि निर्धारी नलभेची॥८५॥ज्यां तेजाचे निज निर्धारें ॥ अहं सोहं समूळ विरे॥त्रैलोक्य ब्रह्मत्व अवतरे ॥ सर्वांगीं भरे स्वानंद ॥ ॥११०॥ज्या तेजाचे निज निष्ठें ॥विषयांचें विषयत्व आटे ॥ बंधमोक्षाचें बिरडें फिटे ॥स्वयें कोंदाटे परब्रह्म॥१११॥ माझ्या स्वरूपाची गोडी॥भक्तीं भोगिली धडफुडी॥ चरणांमृतीं सुखाची गोडी ॥ चोखीं आवडी अंगुष्ठ ॥ ७५॥

४ दशरथ राजा कौसल्येच्या दर्शनास गेला तेव्हांच्या तिच्या स्थितीचें वर्णन.

५ राम बाळपणीं काय करूं लागला तें.

धर्मांची पाहाली पाहांट ॥ स्वानंदाची मोकळी वाट॥सु-
खाची पिकली पेंठ ॥समयो श्रेष्ठ साधूनी॥८४॥सकळ
जगाचा निज विश्राम ॥ सकळ सुखाचा आराम ॥ जो
निष्कामाचा पूर्ण काम॥तो श्रीराम दशरथात्मज॥११९॥
सकळ लक्षा अलक्षण॥जो सकळ लक्षणीं संपूर्ण॥तो-
ची तो लक्ष्मण जाण॥सुमित्रा नंदन दशरथात्मज ॥१२०॥
ज्याचेनी सकळ पदार्थ ॥ सदा सर्वदा संपूर्ण भरित ॥
ते वस्तूसी ह्मणती भरत ॥ कैकेयीसुत दशरथात्मज ॥
॥१२१॥ मनुष्य शत्रूचें हनन ॥ करी तो अल्प शत्रुघ्न ॥
भवशत्रूचें निर्दळण॥करी तो शत्रुघ्न दशरथात्मज॥१२२॥
देह तंव अत्यंत अशक्त ॥ देहकर्म तेंहि नाशिवंत॥कर्म

८ राम कुमारदशेंतच विश्वामित्रास मुमुक्षूपणाचें चिन्ह बोलून दाखवूं लागले.

REFBK-0019509

फळ तें क्षयभूत ॥ सुख कोण येथें देहसंगें ॥५॥ देह नित्य
मुत्राची नाहाणी ॥ देह तंव नर्कांची खाणी ॥ देह तंव
पोहाणी घाणी ॥ रोगांची श्रेणी तो देह ॥१०॥ उत्तम भोग
पदार्थ आहे ॥ देह लोभें ते भोक्ता खाये ॥ क्षणमात्रें विष्ठा
होये ॥ हा देहाचा पाहें परिपाक ॥१७॥ नित्य विषय से-
वितां पूर्ण ॥ नित्य नवी वाढे [illegible]णवण ॥ कल्पांतीं तृप्ति
नव्हे जाण ॥ सुख कोण देह [illegible]गें ॥ १९ ॥ रजस्वलेचा
लागतां पालव ॥ सचैल स्नानाच[illegible] उद्भव ॥ त्या अशुद्धाचा
ओंतींव देह ॥ अपवित्र पाहा हो[illegible] समूळीं ॥२२॥ रजस्वले-
चें पूर्ण रुधिर ॥ तेथें पित्याचें रेत[illegible] मात्र ॥ तेंचि गांठोनि होय
शरीर ॥ मुख्य अपवित्र देह स[illegible]ग ॥२७॥ जननीजठरीं
आग्नि माझारीं ॥ विष्ठेच्या दाथ[illegible]वरी ॥ मूत्राच्या आंध-

रा०भा० ॥ २ ॥

णा भीतरीं ॥ नव मासवरी उकडिजे ॥२८॥ जठराग्नीच्या तोंडीं ॥ उकडितां गर्भाची उंडी ॥ रस उकडतां होय पिंडी ॥ अष्टांगांचीं कांडी व्यक्ति येती ॥२९॥ विष्ठा लेप चहूंकडे ॥ नाकीं तोंडीं जंतु किडे ॥ तें दुःख भोगितां जीव रडे ॥ अतिचरफडे तळमळी ॥ ३० ॥ त्वचा नाहीं गर्भ खोळे ॥ तंव मातेसी होतां डोहळा । कट्वाम्ल सेवितां पोळे ॥ सर्वांग हुरपळे गर्भाचें ॥ ३१ ॥ त्रिकाळ भोजन मातेसी ॥ त्रिकाळ दुःख तें गर्भासी ॥ भोगितां होय कासाविसी ॥ कोणापासीं सांगेल ॥ ३२ ॥ नाहीं वायूचें आगमन ॥ नाहीं मायदाईचें शांतवन ॥ नाहीं स्वजनाचें समाधान ॥ दुःखें संपूर्ण अति दुःखी ॥ ३३ ॥ ते काळीं विचार करी पूर्ण ॥ आतां जन्मल्या आपण ॥ विषयास्तव गर्भपतन ॥ तें विषय-

सेवन करीना ॥ ३८ ॥ सद्गुरूसी रिघोनि शरण ॥ नि-
र्दाळोनियां अभिमान ॥ निवारीन जन्ममरण ॥ तेही
आठवण विसरवी देह ॥३९॥ गर्भजन्में बाहेर पडे॥सोहं
भाव तत्काळ उडे ॥ कोहं म्हणवें दीर्घ रडे॥जन्मल्या पुढें
सुख काय ॥४०॥ जन्मकाळापासोनि देख ॥ आयुष्य
जातसे अमोलिक॥यालागीं जो तो पुसे जातक॥कोणी
राहातक पुसेना ॥४१॥ लाळ थुंका विष्ठा मूत्र ॥ त्या-
माजी सदा असे पचत ॥तोचि स्वइच्छा स्वयें भक्षित॥
बाळपणीं एथें सुख कोण॥४६॥आयुष्याचा नित्य घात॥
नि:शेष नासे परमार्थ ॥ तो हा विषयांचा संघात॥ तारु-
ण्यांत मुसमुसी ॥५४ ॥ स्त्री अस्थिमांसकोथळा ॥ स्त्री
केवळ विष्ठेचा गोळा ॥ स्त्री वसतिस्थान विटाळा॥नरक

सोहळा विषयसंगें ॥ ५९ ॥ ऐसिया स्त्रीसंगापासीं ॥ तारुण्य पुरुष करी दासी ॥ अखंड सेवी तियेसी ॥ चिळसी मानसीं धरीना ॥६०॥ जरेचें भय बहूवस ॥जरा नाशी शरीरभास ॥ धाकें पालटती केंस ॥ सुखाचा लेश तेथें नाहीं ॥६८ ॥ वार्द्धक्यीं जिरेना अन्न ॥ तरी खावयाची तृष्णा गहन ॥ वृद्धांचें सदां सचिंत मन ॥ सुख कोण वार्द्धक्यीं ॥ ७२ ॥ शतवर्षें विषयासक्ति ॥एका इंद्रिया नव्हे तृप्ति ॥ उत्तमा आयुष्या झाली शांति ॥केवळ अधःपाती देहसंग ॥८२॥ गुरुवांक्येंवीण जें ज्ञान॥ तें क्षयरोगी जन्मलें जाण ॥ विकल्पमात्रें सांडी प्राण ॥अति क्षीण अपायी ॥४३ ॥ *संगं त्यक्त्वा सुखी भव ॥ अहं नव्हें

---

* शुकाच जनकाचा संवादरूप उपदेश.

मी देहममत्वें ॥ सोहं नव्हे मी मायिकत्वें ॥अहं सोहं-
हूनि परतें ॥ तें मी निश्चितें निजरूप ॥ ८१ ॥ राजा ह्मणे
तटस्थ स्थिति ॥शुका कोठें आहे तुझी वृत्ति ॥ येरु ह्मणे
आत्मप्रतीति ॥ वृत्ति निवृत्ति सुखरूप॥९६॥ जैसी आत्म-
स्थिती आहे ॥ त्याची स्थितीं डोळां पाहें ॥ तेव्हां दृश्य
द्रष्टा चिन्मात्र होय ॥ हा अनुभव पाहें आत्मत्वाचा॥९७॥
शुक जंव आत्मस्थिति पाहे ॥ विस्मयें चाकाटला ठायें॥
निज देह नाहीं होय ॥ दृश्यत्वें राहे ब्रह्म पूर्णत्वें॥९८॥देह
देखतां दोष कोटी॥आत्मत्वें पहातां निज सृष्टि॥यालागीं
देहीं न ठेवावी दृष्टि ॥ दोषाची खोटी देहात्मता ॥१२४ ॥
स्नेहसूत्रें दीप भिन्न॥ प्रभा एकत्वें अभिन्न ॥ तेवीं ज्ञात्या-
चें विचित्र कर्म चिन्ह ॥ परी ज्ञेयज्ञान एकचि॥ १२१ ॥

निमाली हृदयाची आधि ॥ इन्द्रियें बुडालीं सुखोद्बोधीं॥
विश्रांति पावलीं त्रिशुद्धि ॥ सुखसुखावबोधीं संतुष्ट
॥ १२८ ॥ वासनासंक्षयो नाम मोक्षइत्युच्यते बुधैः
॥पदार्थवासनासक्ति बंध इत्यभिधीयते ॥ २ ॥ अशि-
ष्यायाविरक्ताययत्किंचिदुपदिश्यते ॥ तत्प्रयात्यपवि-
त्रत्वं गोक्षीरं श्वदृताविव ॥ ४ ॥ ज्ञानवैराग्य ऐश्वर्य
ख्याति ॥ यश श्री औदार्य स्थिति ॥ हे साहि गुण
वसिष्ठासी असती ॥ भगवंत ह्मणती तेणें त्यासी ।३५॥
शिष्य उपदेशीं उदासभूत॥गुरु साक्षेपी उपदेशार्थ । तेणें
गुरुचा झाला घात ॥ अविवेकें लोलुप शिष्यार्थी ।४३॥
श्रीराम उवाच-प्राक्तनं वासनाजालं नियोजयति माय-

¹ एथून वसिष्ठाचा रामास उपदेशक्रम लागला.

या॥मुने तथैव तिष्ठामि कृपणः किंकरोम्यहम् ॥६ ॥ ऐकें मुनी सावधान । जैसें माझें पूर्व प्राचीन ॥ मी त्या प्रारब्धाधीन॥स्वयेंकर्तेंपण मज नाहीं॥६२॥देह असतां प्रारब्धाधीन॥जेणें होय ब्रह्मज्ञान ॥ तैसी कृपा करावी परिपूर्णे ॥ ज्ञानविज्ञान परिपाक ॥ ६४॥ नरदेहा ऐसें गोमटें ॥ शोधितां त्रैलोक्यीं न भेटे ॥ देहा ऐसें वोखटें ॥अत्यंत खोटें आन नाहीं ॥ ६६ ॥ वोखटें ह्मणोनि त्यागावें॥तरी मोक्षसुखा नागवावें ॥ गोमटें ह्मणोनि भोगावें ॥ तैं अवश्य जावें अधःपाता ॥६७॥ हें भोगावें ना त्यागावें ॥मध्यभाग विभागावें॥ भगवन्मार्गी लावावें॥तरीच पावावें परमार्थ सुख ॥ ६८ ॥ शुभाशुभाभ्यां मार्गाभ्यां वहंति वासनासरित् । सामनः पुरुषार्थेन योजनीयास्ति मे म-

तिः ॥ ८ ॥ मनोरथ नानावृत्ति ॥ यानाव वासनासरिता
ह्मणती ॥ इयेमाजी बुडाले नेणों किती ॥ बळी ते तरती
निज पुरुषार्थें ॥ ७० ॥ शुभाशुभ वासना ओघ ॥ सबळ
बळें वाहती अनेग ॥ते विवेकें मोडोनि सांग ॥ परमार्थीं
चांग पुरुषार्थ कीजे ॥७१॥ अनुसंधान सांडितां चित्ता॥
वळवून लावावें परमार्था ॥ येविषयीं करावें पुरुषार्था ॥
चित्तजयार्था साटोप ॥ ७४ ॥ वेदशास्त्र श्रुति पुराण ॥
नाना कळा अतिविंदान ॥ अनभ्यासें होय क्षीण ॥ ज्ञा-
नाचें लक्षण ऐसें नव्हे ॥ ८० ॥ ज्ञान प्राप्तकाळीं जाण ॥
अनभ्यासें वाढे पूर्ण ॥ जन्ममरण करी क्षीण ॥ तें प्रब-
ळपण ज्ञानाचें ॥ ८१ ॥ ज्ञानसुलभत्वें सुखप्राप्ति ॥ तरी
कां साधक सदा शीणती ॥त्यांसी अनुताप नाहीं चित्तीं॥

अवैराग्यें प्राप्ति ज्ञानाची नव्हे ॥८३॥ श्रीरामउवाच–एवं स्थिते बद्धमुक्ते कथमेतज्जने स्थिते॥ क्रमो गुरूपदेशस्य-स्वात्मज्ञानस्य कारणम्॥१०॥वसिष्ठ उवाच–उपदेशक्र-मो राम व्यवस्थामात्रपालनम् ॥ज्ञप्तेस्तु कारणं शुद्धा शि-ष्यप्रज्ञैव केवला ॥११॥ गुरुपासीं नाहीं ज्ञानाचा गोळा॥ गिळवी शिष्याहातीं तत्काळा ॥ गुरुपें नाहीं ज्ञानधनमो-टळा॥जे शिष्या जवळा स्वयें दे ॥ ९१॥उपदेशक्रम रघू-नाथा॥गुरु नसांगोनि सांगता ॥शिष्य कानेवीण ऐकता॥ प्राप्ति परमार्था तैं लाभे ॥ ९३ ॥ शिष्या चित्तीं विषयास-क्ति ॥ गुरूपदेशें नव्हे परमार्थप्राप्ति ॥ तो उपदेश जाय व्यर्थ अंतीं ॥ करी विपरीतार्थी ज्ञानगर्वें॥१०२॥ वसिष्ठ उवाच–साधुसंगमसच्छास्त्रपरो भवसि राम चेत् ॥तद्दि-

ने नैवनो म सैःप्राप्नोसि परमां धियम् ॥१३ ॥ विषयांचें
जें गोडपण ॥ तें गोडीचें ब्रह्मपूर्ण ॥तें गोडीचें जें ज्ञातेप-
ण ॥ तें चै न्यघन जाणावें ॥१२३ ॥ यस्यानंदस्यमात्रा-
जीवंति ॥ त्रेषयगोडी ब्रह्मस्फूर्ती ॥भोक्ता भोगी स्वयें चि-
च्छक्ति॥ज गीव ते निश्चिती परब्रह्म॥१२४॥व०उ०- श्रूय-
तां ज्ञानस स्वं श्रुत्वा चैवावधारयेत् ॥ भोगेच्छा मात्रको
बंधस्तत्त्या ो मोक्ष उच्यते ॥ १५ ॥ ज्ञानकथा अवघेचि
ऐकती ॥ परी ऐकिलें तें नाचरती ॥ यालागीं श्रवणाचीं
होय माती ॥ परमार्थ प्राप्ति त्यां कैंची ॥१३०॥ (बुद्धीनें
भोगेच्छामन आक्रमावें ) मनें मनाचा निग्रहो ऐसा ॥जे-
थें समूळ निमे आशा ॥ चैतन्याचा ओते ठसा ॥ प्रपंच
आपैसा परब्रह्म होय ॥१३६॥स्वयंभू हृदयीं ब्रह्मस्थिति॥

अवैराग्यें प्राप्ति ज्ञानाची नव्हे ॥८३॥ श्रीरामउवाच–एवं
स्थिते बद्धमुक्ते कथमेतज्जने स्थिते॥ क्रमो गुरूपदेशस्य-
स्वात्मज्ञानस्य कारणम्॥१०॥वसिष्ठ उवाच–उपदेशक्र-
मो राम व्यवस्थामात्रपालनम् । ज्ञप्तेस्तु कारणं शुद्धा शि-
ष्यप्रज्ञैव केवला ॥११॥ गुरुपासीं नाहीं ज्ञानाचा गोळा॥
गिळवी शिष्याहातीं तत्काळा ॥ गुरुपें नाहीं ज्ञानघनमो-
टळा॥जे शिष्या जवळा स्वयें दे ॥ ९१॥उपदेशक्रम रघू-
नाथा॥गुरु नसांगोनि सांगता ॥शिष्य कानेवीण ऐकता॥
प्राप्ति परमार्था तैं लाभे ॥ ९३ ॥ शिष्या चित्तीं विषयास-
क्ति ॥ गुरूपदेशें नव्हे परमार्थप्राप्ति ॥ तो उपदेश जाय
व्यर्थ अंतीं ॥ करी विपरीतार्थी ज्ञानगर्वें॥१०२॥ वसिष्ठ
उवाच–साधुसंगमसच्छास्त्रपरो भवसि राम चेत् ॥तद्दि-

ने नैवनो मासैःप्राप्नोसि परमां धियम् ॥१३ ॥ विषयांचें जें गोडपण ॥ तें गोडीचें ब्रह्मपूर्ण ॥तें गोडीचें जें ज्ञातेपण ॥ तें चैतन्यघन जाणावें ॥१२३ ॥ यस्यानंदस्यमात्राजीवंति ॥ विषयगोडी ब्रह्मस्फूर्ती ॥भोक्ता भोगी स्वयें चिच्छक्ति॥जाणीव ते निश्चिती परब्रह्म॥१२४॥व०उ०- श्रूयतां ज्ञानसर्वस्वं श्रुत्वा चैवावधारयेत् ॥ भोगेच्छा मात्रको बंधस्तत्त्यागो मोक्ष उच्यते ॥ १५ ॥ ज्ञानकथा अवघेचि ऐकती ॥ परी ऐकिलें तें नाचरती ॥ यालागीं श्रवणाचीं होय माती ॥ परमार्थ प्राप्ति त्यां कैंची ॥१३०॥ (बुद्धीनें भोगेच्छामन आक्रमावें ) मनें मनाचा निग्रहो ऐसा ॥जेथें समूळ निमे आशा ॥ चैतन्याचा ओते ठसा ॥ प्रपंच आपैसा परब्रह्म होय ॥१३६॥स्वयंभू हृदयीं ब्रह्मास्थिति॥

ब्रह्मप्रभा इंद्रियवृत्ति॥तें अभावें ब्रह्म नव्हे ह्मणती॥ सद्भा-
वें होती परब्रह्म ॥ १३८ ॥ ऐसा अवस्थात्रयीं सावधान॥
हेंचि भगवंताचें भजन॥हेंचि परमात्म्याचें पूजन॥हेंचि स-
माधान जीवशिवांचें ॥१४८॥( ब्रह्म केवळ स्वानंदकंदु॥
परमानंदु परिपूर्ण॥ )यदिदं किंचिदाभाति जगज्जालं प्रदृ-
श्यते ॥ तत्सर्वममलं ब्रह्म बहिरंतर्व्यवस्थितं ॥१६ ॥ ऐ-
कें श्रीरामा जगाची स्थिति॥परब्रह्म का रम भ्रांति॥ति-
सरीयाची नाहीं वसति ॥जाण निश्चितीं रघुनाथा॥१६०॥
जग देखणें परम भ्रम ॥ जग न देखणें तें परब्रह्म ॥ हें
ज्ञान गुह्य निजवर्म ॥ तूं पुरुषोत्तम परमात्मा॥१६७॥ हो-
तां स्वरूपीं भेटी॥चित्त चैतन्या पडे मिठी॥हर्षें बाष्प दाटे
कंठीं॥आनंद पोटीं नसमाये॥१८२॥आनंद हृदयीं नमाये

तो नेत्रीं उलथुं पाहे ॥ पूर्ण दाटला विस्मये॥देहाची सोय स्फुरेना॥१८३॥सर्व भूतांचे गुणागुण ॥जगाचें दोषदर्शन दिसतां न मोडे ब्रह्मपण॥ ते समाधि पूर्ण पूर्णत्वें॥२३१॥ अंतरेको बहिर्नाना अंतर्बोधो बहिर्जडः ॥ अंतरस्त्यागी बहिःसंगी लोके विहर राघव ॥ २४ ॥ प्रबुद्धः श्रीराम उवाच—सर्वे शृणुत भद्रं वो निश्चयेन सुनिश्चितम् ॥ आत्मज्ञानात्परं नास्ति गुरोरपिच तद्विद ॥२८॥ – बोध झाल्यावर सावधान होऊन श्रीराम असें बोलले ॥त्या आत्मज्ञानाचा निजज्ञाता ॥ सद्गुरुहूनि अधिकता ॥ नाहीं अधिक दैवता ॥ मुख्य गुणातीत तो वंद्य ॥ २८५॥ जैंरी झाला दुराचारी ॥ तो जैं भरे अनुताप भरीं ॥ रामनामें जपे जिव्हारीं ॥ तो साधुसंसारीं भगवद्वाक्यें ॥ १६० ॥

नामकीर्ति विरक्ति भक्ति ॥ इंहीं तीन पेणा वस्ती ॥ चौथें पेणें रघूपति ॥ निजात्मप्रीतीं भेटले ॥ ६३ ॥ त्रिगुणाचें[23] निज त्रिकुट ॥ निर्गुणें भरलें त्याचें पोट ॥ स घमाचित उ- ब्दट ॥ अतिस्वादिष्ट श्रीरामें ॥९९॥ लक्षुनि पूर्ण परमा- नंदु ॥ प्रकट सच्चिदानंदु॥ तैसें रामासमवेत चौघे बंधु ॥ निजात्मबोधु एकात्मता ॥७६॥ (एक चढले परे उपरी) एक चढोनि जीवाचे माथां ॥ सादरें पाहाती रघूनाथा ॥ एक सांडोनि जीविता ॥ श्रीरघुनाथा भेटती ॥ ३२ ॥

इति बालकांडम् ॥

॥ असंगसंग दोषेण साधवो यान्ति विक्रियाम् ॥

॥ एक रात्र प्रसंगेन काष्ठघंटा विटंबना ॥ १ ॥

---

२३ रामाच्या लग्नांतल्या जेवणातील लोणच्याचें वर्णन.

मूळ ग्रंथांतील या कांडांत ओव्या ३२८८ व श्लोक ६७ मिळून २७ अध्याय आहेत.

अथ अयोध्याकांडम् ॥सांडोनि मीतूंपणाचा संगात॥ रिघावें सातवे द्वारा आंत ॥ तैंच भेटे श्रीरघुनाथ ॥ मुख्य परमार्थ यानांव ॥ ५० ॥ भावार्थ तें राजभुवन ॥ प्रथम दारवंटा तें श्रवण ॥ दुसरें द्वार तें साधन ॥ नित्यानित्यविचारण तें तिजें ॥ ५१ ॥ चौथा दारवंटा मनन ॥ पांचवा निजध्यांस जाण॥साहावा तें वैराग्य पूर्ण॥सातवा जाण साक्षात्कार ॥५२ ॥ त्याची मार्गाचे परिपाठीं ॥ श्रीरामासी होय भेटी ॥ भलतीया जातां आव्हाटी ॥ वाजती पाठीं यमदंड ॥ ५३ ॥ हृदयीं असतां आत्माराम ॥जनासी पडला मोह भ्रम ॥ अवघे झाले विषयकाम ॥कल्पांतीं राम न भेटे ॥ ४४ ॥ मुखीं नित्य श्रीरामनाम ॥ सर्व इ-

न्द्रियीं श्रीराम कर्म ॥ हृदयीं परमात्मा श्रीराम ॥ भक्तो-
त्तम सौमित्र ॥ ११३ ॥ वांचे राम नामस्मरण ॥ रामरू-
पीं जडले नयन ॥ हृदयीं धरिलीया रघुनंदन ॥ दुर्मन तें
सुमन होय श्रीरामें ॥ ५ ॥ विषें विषय समान स्थिति ॥
येकें विषया अधिक शक्ति ॥ विष भक्षिल्या एकदा मरती ॥
जन्ममरणपंक्ति विषयेंचि ॥ ४७ ॥ *अंतरला सुखावबोधु ॥
अंतरला स्वानंदकंदु ॥ अंतरला निजात्मबोधु ॥ राम प-
रमानंदु अंतरला ॥ ५५ ॥ राम माझा निजात्मा ॥ राम
माझा जीवात्मा ॥ राम माझा परमात्मा ॥ तो कां आह्मां
विसरला ॥ ६६ ॥ राम मज नित्य निववी ॥ राम जीव शि-
वां गोसावी ॥ राम सुखानंद जान्हवी ॥ कैकेयियें अव-

* एथून भरताच्या राम विरहशोक वर्णितात.

घी कोरडी केली ॥७७॥ राम मज निजें निजवी ॥ राम
जीवेंवीण जीववी ॥ राम माझी आनंद पदवी ॥ ते कैके-
यियें अवघी वंचिली ॥७८॥ राम माझें मुख्य मुद्दल ॥
राम माझें निजभांडवल ॥ राम माझें निजबळ॥तें कैके-
यियें केवळ भेदें वंचिलें॥७९॥ राम माझें निज जीवन॥
राम माझें निज अंजन ॥ राम माझें निज निधान॥तें कै-
केयियें चोरोन नेलें भेदें ॥८०॥ श्रीराम माझी मातापि-
ता ॥ श्रीराम माझा सुहृद्दाता ॥ श्रीराम सद्गुरु निजात्म-
ता ॥ श्रीराम तत्वता आत्मा माझा ॥८४॥ कवलेकवले
गोविंदं स्मृत्वा भुंजंति योगिनः ॥ तत्र भोक्ता हरिःसाक्षा-
न् मुक्तःस्यान्नात्र संशयः ॥२॥ स्मरतां श्रीरामाचें नाम ॥
मावळले क्रोध काम ॥ निघोनि गेला लोभ संभ्रम ॥भ-

ए०भा० रत निष्काम अवधारा ॥९१॥ इति अयोध्याकांडम् ॥ रा०स्ता०

मूळ ग्रंथांत या कांडांत अ० १८ओव्या २१११ व श्लोक ६७ आहेत.

॥१०॥ अथ अरण्यकांडम् ॥ [1]नाम शुद्ध अथवा अशुद्ध॥जो जपे
तो पावन शुद्ध ॥ श्रीरामनाम जगद्वंद्य ॥ परमानंद होरे
नामें ॥४॥ [2]अतिशयें भोगितां आपत्ति ॥ यालागीं अप
त्य ह्मणती ॥ स्वविष्ठा स्वयें चिवडिती ॥ तें बालत्व प्राप्ति
तिन्ही देवां ॥४८॥ [3]लोक लोकांतरीं देख ॥ न तुटे दुःख
नव्हेचि सुख ॥ तुझें देखतां श्रीमुख ॥ अलौलिक सुख
प्राप्ति ॥३८॥ [4]तंवचि वैराग्याच्या गोष्टी ॥ जंव सुंदर व
निता न देखे दृष्टीं ॥ एकांतीं तीस झालिया भेटी ॥ वि-
रक्तही उठी भोगार्थी ॥६४॥ [6]स्वादामृत उन्मादामृत ॥
सुप्तामृत तृप्तामृत ॥ ये अमृतें प्रलोभार्थ ॥ परमामृत पां- ॥१०॥

चवें॥१११॥जो सप्रेम स्मरे नाम ॥ त्या आधीन पुरुषो-
त्तम ॥ नामें संतुष्ट आत्माराम॥भक्तकाम कृपाळु॥३३॥

॥ श्रद्धया हेलया नाम स्मरंति मम जंतवः ॥
॥ तेषां नाम सदा पार्थ वर्तते हृदये मम ॥

श्रद्धें हेळया जो स्मरे नाम॥त्याचें मी हृदयीं वाहें नाम ॥
नामनिष्ठाचें पुरवीं काम ॥ नामें सुगम मत्प्राप्ति ॥३४॥
अग्निकुंडसमा नारी घृतकुंभ समो नरः ॥ दृष्ट्वा गुह्यं
परस्त्रीणां कस्य नोच्चलितं मनः ॥५॥ स्त्री तंव अग्निकुंड
केवळ ॥ नर घृतकुंभ तो विठ्ठळ ॥ देखोनि दारागुह्यस्थ-
ळ॥मन निश्चळ कोणाचें॥३०॥जयजयाजी श्रीरघुनाथा॥
अनाथबंधु दिनानाथा ॥ कृपाकरीं गा भगवंता ॥ मज र-
क्षिता आन नाहीं ॥६२॥ श्रीरामाचे निजभक्त ॥ कर्में

करोनि अलिप्त ॥ हरिभक्तांचें पढतां चरित्र ॥ नित्य मुक्त
महादोषी ॥६९॥ श्रीरामश्याम अति सुंदर ॥ रमारमणी-
य मनोहर ॥सुखस्वरूप सुखाकार॥ब्रह्मसाकार श्रीराम
॥७०॥कमलनयन कमलपत्र॥सुखैकघन श्रीरामवक्त्र॥
मुख देखिल्या निवती नेत्र ॥ सुखशृंगार श्रीराम ॥७१॥
[१४]उत्तम अन्न आणि पक्वान्न॥वस्त्रें अलंकार आणि भूषण॥
पतिवीण भोगी आपण ॥ ते स्त्री जाण समवेश्या ॥४८॥
[१५]आत्मबुद्धि र्हितार्थाय गुरुबुद्धिर्विशेषतः॥परबुद्धिर्विनाशाय
स्त्रीबुद्धिःप्रलयंगता ॥४॥ निजात्मबुद्धि ते हितासी ॥सद्गु-
रुबुद्धि सुखैकराशी॥ परबुद्धि ते विनाशासी॥मूळ प्रळया-
सी स्त्रीबुद्धि ॥ २८ ॥ स्वभावोयंहि न रीणां त्रिषुलोकेषु
कथ्यते ॥ विमुक्तधर्माश्चपलास्तीक्ष्णा भेदकराः स्त्रियः

॥८॥स्त्रीस्वभाव दुष्ट अद्भुत ॥ जे नवमास वाहे उदरांत ॥
जे सोसी सदा नरकमूत ॥ त्या मातेसी सुत परस्त्री करी
॥ ५१ ॥ बंधु बंधूसी वैराकार ॥ वाढवावया मुख्य सा-
चार ॥ स्त्रीसंगाचा बडिवार॥वेगळाचार सुहृदांसीं ॥५२॥
भ्रतार जें दे संतोषोन ॥ तें स्त्रियेसी अतिपावन ॥ स्वमु-
खें मागतां आपण ॥ दुःख दारुण पावलें ॥ ३२ ॥ मुखीं
श्रीरामनामस्मरण ॥ चित्तीं श्रीराम चिंतन ॥ नयनीं श्री-
राम अवलोकन ॥ हृदयीं ध्यान श्रीरामाचें ॥१४८॥[२०]दंष्य
दारा त्यागोन्मुख ॥ शोधित सत्वाचा सात्विक ॥ पूर्णपर-
मार्थी सविवेक ॥ त्यासी परिपाक सांगावा ॥८१॥ गाळीं-
व भावाचा भावार्थ ॥ सर्वभूतीं श्रीभगवंत ॥ हाचि मुख्य-
त्वें परमार्थ ॥ निजस्वार्थ परब्रह्म ॥ ९७ ॥ [२१]योगयाग धर्म-

स्थिति ॥ धार्मिक जे गति पावती॥ते भोगक्षयें क्षया जाती ॥ पुनरावृत्ति सर्वांसी ॥८६॥ राम ह्मणे लागल्या दृढ बंधन॥तरी आपणा सोडवावें आपण॥दुज्याची करी जो आस जाण ॥ हीन दीन तो नपुंसक ॥ २९ ॥ पोटाचिये चिंते हातीं ॥ जगासी पडली अतिभ्रांति ॥ हृदयीं नाठवे श्रीरघुपति ॥ ऐसीं दुःखावतीं उदरार्थ ॥७१॥ आच्छादावया निजज्ञान ॥ श्रीरामा मुख्य देहबंधन ॥ देहाभिमान केलिया दहन ॥ ज्ञानविज्ञान प्रांजळ॥९३॥ इंद्रियेंकर्माची प्रवृति ॥ तुज आहे अकर्त्तात्मप्रतीति ॥ तैं सकळ वासना होय शांति ॥सुखस्थिति स्वानंदु ॥२६॥ ऐसी नित्यानंद प्रतीति ॥ यानांव सार्थकता स्थिति ॥ निजदेह मिथ्यत्वें देखती ॥ मुख्य परमार्थी तो एकू ॥२७॥ जे जा-

ती विमानगति ॥ ते पावती पुनरावृत्ति ॥ तें नाहीं शबरी-
प्रति ॥ अगम्य गति ते गेली॥५६॥ इति अरण्यकांडम्॥

मूळ ग्रंथांत या कांडांत अ० २२ ओ० २९६५ व श्लो०१४८ आहेत.

अथ किष्किंधाकांडम् ॥ श्रीराम प्रेमवत्सळ ॥ श्रीराम
निरपेक्ष स्नेहाळु ॥ श्रीराम भक्तकाजकृपाळु ॥ दीनद-
याळु श्रीराम ॥१७॥ पिता पुत्रा सख्य सहोदरा॥ वैरासी
मूळ द्रव्यदारा ॥ सुहृद पेटती वैराकारा ॥ द्रव्यदारा देह
लोभें ॥६॥ श्रीरामनाम द्वय अक्षर॥ क्षराक्षरातीत पर॥
रामनाम स्मरे निरंतर ॥ पावन नर तिहीं लोकीं॥१४२॥
श्रीरामा[६] तूं तंव निजविवेका ॥विषय भोगिता या लोकीं॥
कोणीतरी झाला सुखी ॥नित्य दुःखी तो विषयी॥१५२॥

६ राम वाली व तारा यांचा एथून उपदेशपर संवाद लागला.

आह्मांसी श्रीरामाचें बळ ॥ आह्मी श्रीरामबळें सबळ ॥ श्रीरामीं भजतां तुह्मी सकळ॥राम केवळ परब्रह्म॥५२॥ बाण नव्हे तो निजात्मबोधू ॥ समूळ माझा छेदिला भेदू॥ तेणें पावलों परमानंदु ॥ आनंदकंदु श्रीराम ॥३८॥ देहो हि काष्ठवद्राम जीवो नित्यश्चिदात्मकः ॥ सुख दुःखादि-संबंधः कस्यस्याद्राम मे वद ॥ १४ ॥ देह तंव जड काष्ठ-प्राय ॥ त्यासी सुखदुःख संबंधू न होय॥ आत्मा चैतन्यघ-न सबाह्य ॥ तेथें न समाय सुखदुःख ॥ ८३॥ सुखदुःखा-चा हा मारा ॥ कोणासी बाधी श्रीरामचन्द्रा ॥ याचा उ-कलू सांगावा खरा ॥ दुःखपरपारा पाववया ॥ ८४ ॥ ऐ-कोनि तारेचा प्रश्नु ॥ स्वयें सांगे श्रीरघुनंदनु ॥ जंवदेहीं देहाभिमानु ॥ दुःख बंधन अविवेक्या ॥ ८५ ॥ देही स-

बाह्य चैतन्यघन ॥ तेथें मिथ्य भासे देहाभिमान ॥ जेवीं दोरा अंगीं सर्पपण ॥ तेवीं संपूर्ण देह मिथ्या ॥८६॥ जन्ममरण देह संभ्रम ॥ क्षुधा तृषा प्राण धर्म ॥ विषयाचे भोग परम ॥ इन्द्रिय कर्म इंद्रियांचें ॥८७॥ सुखदुःख भय शोक ॥ मनोधर्म हे आवश्यक ॥ हरिहर ब्रह्मा त्रिगुणात्मक ॥ काल्पनिक संसारू ॥८८॥ आत्मा गुणीं गुणातीत ॥ देहीं देहबाह्य अलिप्त ॥ तेही विषयींचा दृष्टांत ॥ सुनिश्चित अवधारीं ॥८९॥ स्फटिक कृष्णवर्णें काळा ॥ पीतवर्णें दिसे पिंवळा ॥ आरक्तें दिसे आरक्त किळा ॥ तरी वेगळा तिहीं रंगीं ॥९०॥ तेवीं आत्मा संसारांतु ॥ त्रिगुणगुणीं गुणातीतु ॥ ऐसा जोडल्या परमार्थु ॥ होय प्रांतु दुःखसुखा ॥९१॥ ऐसी व्हावया निज प्राप्ति ॥ अवश्य पाहिजे सत्संगती ॥ त्याचेनि

संगें विषय विरक्ति ॥ तैं परमार्थीं अधिकारु ॥९२॥ शब्द छेदी विकल्प समस्त ॥ परमानंदें नित्यतृप्त ॥ तैंसीया गुरूपासीं परमार्थ ॥ सुनिश्चितार्थ साधावा ॥ ९३ ॥ वेदानुवादें सप्रमाण ॥ ऐकोनि सद्गुरुवचन ॥ देहीं मिथ्या देहपण ॥ नित्य चैतन्य अनुलक्षीं॥९४॥ अनुलक्षितां चैतन्यघन ॥ परमानंदीं मूर्च्छापन्न ॥ श्रीराम कृपाळु पावला पूर्ण ॥ देहाभिमान विसरली ॥९५॥ स्त्री पुरुष उभयदेहीं । आत्म्यावांचुनि आत्मीं नाहीं ॥ दृष्टि ठेवितां तियेठायीं ॥ देही विदेही सहजत्वें॥११५॥हे चुकलीया निजात्मदृष्टि ॥ सपत्नि भोगितां नरक कोटी ॥ निजात्मदृष्टिच्या ॥ संतुष्टीं ॥ द्वंद्व घोंटी ममाज्ञा॥११६॥ नामापासीं नित्यकीर्ति॥ नामापासीं नित्य शांति ॥ नामापासीं विजयवृत्ति॥भवनि-

मुक्ति रामनामें ॥ ३३ ॥ ज्ञांन मारुती वांछितां ॥ अंतरीं
उगवोनि चित्सविता॥ज्ञान विज्ञान लीनता ॥देहीं विदेह-
ता श्रीरामीं ॥१४३॥ ज्ञान विज्ञान संतृप्ति ॥ देहीं असो-
नि विदेह स्थिति ॥ श्रीरामाची अनन्य भक्ति॥झाला मा
रुती जगद्वंद्य॥१४४॥पांहा पां कैसे अभागी जन ॥सांडो-
नियां श्रीराम स्मरण॥करितां आन आन साधन॥जन्म-
मरण सोडीना ॥१०८। नामापासीं साधनशक्ति ॥ नाम-
स्मरण मुख्य भक्ति॥ भक्तीपासीं चारी मुक्ति ॥ वेदशास्त्रा-
थीं संमत ॥१०९॥आत्यंतिक प्रळयाची गोष्टी ॥लोक न
देखती दृष्टीं॥तो तंव अज्ञानाच्या पोटीं ॥गुरुवाक्यें उठी
लखलखित॥१२५॥बाप गुरुवाक्याची दृष्टि॥सान थोर स-
मूळ निवटी॥कैंचादेव कैंची सृष्टि ॥ नळी निमिठी जीवशी-

१९५०९

वां॥१२६॥ज्ञेय ज्ञान ध्येय ध्यान॥दृश्य द्रष्टा आणि दर्शन॥
त्रिगुण त्रिपुटी निर्दळण ॥ब्रह्म परिपूर्ण पूर्णत्वें॥१२७॥जे-
थें जीवशिवत्व नाहीं॥ कैंचें वैकुंठ कैलास शेषशाई ॥ मी
तूंपण मुळींच नाहीं ॥ ब्रह्म पाहीं परिपूर्ण ॥ १२८ ॥ विरे
वैकुंठेंसीं नारायण ॥ विरे शेषेंसी शेषशयन ॥ कैलासेंसीं
त्रिनयन ॥ जाय विरोन परब्रह्मीं ॥१२९॥ गुरुवाक्याचेनि
बोलें ॥ अत्यंत प्रळयाचें रूप केलें ॥ब्रह्मचि एक एकलें॥
असे कोंदलें परिपूर्ण ॥ १३० ॥ सद्गुरुमुखेंसी सद्भावें॥स्व-
रूप निश्चय न करवे ॥ तरी ते वस्तु प्राप्ति न होये ॥ व्यर्थ
भोंवे वनवासी ॥ ७ ॥ देहाभिमानाचिये माथां ॥ नित्यवसे
मरणावस्था ॥ अहं ममता न संडितां ॥ निर्मरणता केवीं
लाभे ॥४५॥ हरिदास दर्शन स्पर्शन॥ अभिवंदन संभाष-

य करितां संपूर्ण॥ मुक्तपण निजबंध

ण ॥ आति संगति ॥ भाग्येंवीण न०्हे प्राप्ति ॥ ७१॥

हरिदासां त्य मुक्ति स्वयंप्रभे ॥ ७२ ॥ हरि साची

सद्भक्ति ॥ । अहं ममता देंटींहूनि सुटलीं ॥ वनिता तींहु-

नि निष्टली ॥ फळें आलीं परिपाका ॥१००॥ संक र वि-

कल्यें तुट आलीं ॥ शांति शेजे स्वयें मुराली ॥ नि र नि-

विकारें पा लीं ॥ फळें सेविलीं वानरें ॥१०१ ॥ जे नैरा-

ग्यें सधर्मा ॥ अंत बीज ना वाहेरी साली ॥ श न दां-

त अरुवार रीं ॥ फ० ॥१०२॥ निजात्मबोधें मधर र स्व-

रूपें साका र रस गळत ॥ जेथें हंस शुक झेंपावत घेत॥

नित्य नैरा ॥ तीं

फळें भक्षि ॥ब्र-

ह्मीं ब्रह्मत्वही लीन ॥ सांडोनियां मीतूंपण ॥ फळें परिपूर्ण

ए०भा० सेविती ॥१०४॥ श्रीरामसेवा नित्यकर्म ॥ हृदयीं श्रीरा- रा०सा०
॥१६॥ माचें प्रेम ॥ मुखीं नित्य श्रीरामनाम ॥ सर्वत्र सुगम गति
त्यासी ॥ ३१ ॥ रामकथेचें अक्षर॥ क्षराक्षरातीत पर ॥
अवघी कथा सन्मात्र ॥ चिदचिन्मात्र रामायण ॥ १३ ॥
इति किष्किंधाकांडम् ॥

मूल ग्रंथांत या कांडांत अ० १८ ओव्या २३५४ व श्लोक २६५ आहेत.

अथ सुंदरकांडम् ॥ श्रीनामें पावनसंसारु॥श्रीरामें पाव-
न चराचरु ॥ श्रीरामें पावन नरु॥ जे तस्मरु नित्य स्मरती
॥३॥ रामनाम शुद्ध साधन ॥ रामनाम शुद्धज्ञान ॥ राम
नामें सुटे बंधन ॥ नाम पावन सर्वार्थी ॥ ४ ॥ तत्वें निरसु-
नि समस्त ॥ साधक आत्मा साधी निश्चित ॥तेवीं घराघ- ॥१६॥
र धांडोळित ॥ असे पहात वैदेही ॥ ४७॥ उंदरीं वाहे नव

मासांत ॥ नरकवास सोशी मूत ॥ ते मातेतें त्यागोनि सुत ॥ मानी अति आप्त स्त्रीयेंनी ॥ ५५ ॥ चित्तामाजी कामाची वस्ती ॥ तेणें चित्तें करितां श्रीरामभक्ति ॥ चित्त पावलीया चैतन्यस्थिति ॥कामनिवृत्ति सहजेंचि॥६९॥ इंद्रियां प्रवर्तक मन॥मनाचे पोटीं स्त्रीपुरुषभान ॥ सकळ कामासी कारण ॥ मनचि जाण बाधक ॥७२॥ जेवीं समुद्रजळीं लवणकण ॥विरोन समुद्र होय आपण ॥ तेवीं करितां श्रीरामस्मरण ॥ मनचि परिपूर्ण परब्रह्म ॥७३॥ राम मनाचें उन्मन ॥ राम चित्ताचें चैतन्यघन ॥राम बुद्धीचें सज्ञान ॥ राम परिपूर्ण परब्रह्म ॥१३९॥राम जंगमीं स्थावरीं॥राम सबाह्य अभ्यंतरीं॥राम परमात्मा श्रीहरी ॥ जगदोद्धारी श्रीराम॥१४०॥हरिकीर्तनतेंस्वकर्म ॥हरिकी

तॅन तो स्वधर्म ॥ हरिकीर्तन प्रेम परम ॥जें परब्रह्म प्रापक ॥१४६॥आळस सोडोनि संभ्रम॥त्यजोनि विषयविषका-म॥प्रयत्न करितां पैं परम॥परब्रह्म आंतुडे॥५८॥कोप आ-लीया दुर्धरु॥जयाचा लोपेना विचारु॥तोचि मोक्षाचा अ-धिकारु॥परम धीरु तो एकू॥२८॥कोपामाजी सावधान॥ अवतार पुरुषाचें हें चिन्ह ॥ तें चालतें ब्रह्मज्ञान॥जग पा-वन त्याचेनि ॥२९॥ श्रीरामांची परम भक्ति ॥ स्वयें जाणे सीतासती ॥ तिचे भजनाची देहस्थिति ॥ भजती युक्ति अवधारा ॥२॥ हृदयीं आत्मा श्रीरघूपति ॥ पाहातां वेद-शास्त्रव्युत्पत्ति ॥ ऐसी जे कां निजप्रतीति ॥ भजनभक्ति ते नांव ॥३॥ तेच भक्ति धरितां चित्तीं ॥ श्रीराम दिसे स-र्वांभूतीं ॥ हे दृष्टीचो भजनस्थिति ॥ केला वेदांतीं निश्चयु

॥४॥ रसासी श्रीराम स्वादता ॥ रसनें राम रसज्ञता ॥
ऐसेनि रसभोग भोगितां ॥ श्रीरघुनाथा निजभजन ॥८॥
श्रीराम मनाचें निजमन ॥ श्रीराम चित्ताचें चैतन्यघन ॥
श्रीराम बुद्धीचें समाधान ॥ विवेकें सज्ञान श्रीराम॥११॥
वरीवरी दिसे सीता समळ ॥ अंतरीं रामध्यान निर्मळ ॥
बाह्य अति चिंतें व्याकुळ ॥ अंतरीं निश्चळ चिन्मय राम
॥४६॥ बाह्य उपवासें आक्षिप्त ॥ अंतरीं परमानंदें तृप्त ॥
बाह्य दिसे वंदीं प्राप्त ॥ अंतरीं निर्मुक्त चहूं देहीं ॥ ४७ ॥
बाह्य रोडेली दिसे काष्ठ ॥ अंतरीं रामनामें घट्टपुष्ट॥बाह्य
राक्षसां मानी दुष्ट ॥ अंतरीं निर्दुष्ट आत्मा मानी ॥४८॥
हृदयीं श्रीरामप्रतीतीं ॥ श्रीराम देखे सर्वांभूतीं॥ भयामा-
जी निर्भयप्राप्ति ॥ सीतासती स्वयें भोगी ॥६६॥ नामें दु-

षण होय भूषण ॥ नामें पापी आतिपावन ॥ नामस्मर-
त्या यम शरण ॥ नाम परिपूर्ण परब्रह्म ॥ ७१ ॥ ना-
मासी नाहीं कर्म बंधन ॥ वेगळ्या कर्मा नामस्मरण ॥
अच्युतनामें कर्म पावन ॥ हें स्मृतिवचन श्रुत्यर्थ ॥७२ ॥
नाम चैतन्याचा मुद्दा ॥ नाम परब्रह्माचा हुडा॥ ब्रह्म नामा-
चिया पुढां ॥नाचे घडघडां स्वानंदें ॥ ७४॥ श्रीराम केव-
ळ आत्माराम ॥ लक्ष्मण सबाह्य निष्काम॥ लाभ अला-
भ दोन्ही सम ॥ देहीं आराम निर्द्वंद्व ॥२४॥ इन्द्रियें अव्य-
क्त देहाभिव्यक्ति ॥ नांवरूप त्रिगुण जाती ॥ निर्दळोनियां
मारुती ॥ गुणातीतीं ते नेले ॥ २०७ ॥ ऐशिये (शुद्धनि-
जात्म) दृष्टीचे जे नर ॥ ते चैतन्याचें निज मंदिर ॥ परब्र-
ह्माचें भांडार ॥ ब्रह्म साकार ते पुरुष ॥६२ ॥ जन्ममरणा-

ची निवृत्ति ॥ सकळ श्रमांची विश्रांति॥त्या रामनामाच्या आवर्ती ॥ जाण निश्चितीं जानकीये ॥ १०२॥ चित्त चिंता चिंतनवृत्ति ॥ सांडोनि स्मरावा श्रीरघुपति ॥हाचि विसांवा विश्रांति ॥ जीवशिव होती परब्रह्म ॥ १२६॥ जीवत्व नाठवे जीवा॥शिवत्व नाठवे शिवा॥नित्य श्रीराम स्मरावा ॥ ते जीवशिवां विश्रांती ॥१२७॥ जन्ममरणाचा महाबाधू ॥ ज्या नाठवे तो मोहांधु॥न देखे नरकपातबाधू॥ तो मदांधु महामूढ ॥ १११ ॥ श्रीहरीसी झालिया शरणांगत ॥ देहीं असोनि देहातीत॥कळीकाळाचे पाडोनि दांत ॥ फाडीन खत विषयांचें ॥१३९॥ ऐसी मज जे आठवण ॥हे श्रीहरीची कृपा पूर्ण ॥हरीचे अनुग्रहावीण ॥ नामस्मरण नाठवे ॥ १४१॥ हृदयीं अंतरात्मा सर्वज्ञ ॥ त्याचेनि

बुद्धींद्रियें सज्ञान ॥ तेणें कायावाचामनें नमन ॥ अन-
न्य शरण गजेंद्र ॥ १ ॥ भगवंतासी अनन्य शरण॥ होतां
पालटे देहचिन्ह ॥ इंद्रियांचें विपरीत ज्ञान ॥ तेंहि लक्षण
अवधारा ॥ २॥ अनन्यत्वीं मन उन्मन ॥चित्त होय चैत-
न्यघन ॥ बुद्धि होय समाधान ॥ अहंता संपूर्ण सोहंत्वीं
विरे ॥ ३ ॥ तेव्हां भूतें होती चिदाकार ॥ विषय होती त-
न्मात्र ॥ अनन्य शरणत्वाचें सूत्र ॥ संसार चरित्र परब्रह्म
॥४०॥ व्हावया अनन्य शरण ॥ पाहिजे भाग्य सत्वसंप-
न्न ॥ तेणें भाग्यें गजेंद्र गहन ॥ करितो नमन भगवंता ॥
॥ ५ ॥ भ्रांतिमाजी सप्तपाश ॥ अहं दारा पुत्र पाश ॥ गृह
धन स्वजनपाश ॥ आशापाश सातवा ॥ ४४ ॥ सत्संगति

नाहीं ज्यासी ॥ रामनाम नाठवे त्यासी ॥ ते गुंतले कर्म-
पाशीं ॥ हृदयस्थेंसी नव्हे भेटी ॥४५॥ रामनाम हे चित्क-
ळा ॥ आवडी आलीया हृदयकमळा ॥ रामकळा कोंद-
ल्या डोळां ॥ संसार सगळा तृणप्राय ॥७९ ॥ विष्णोर्ना-
मैव पुंसःशमलमपहरेत् पुण्यमुत्पादयेच्च ॥ ब्रह्मादिस्थान-
भोगान् प्रदिशति गुरोः श्रीपदद्वंद्वभक्तिं ॥ तत्वज्ञानं च
विष्णोरिहमतिजननभ्रांतिबीजंच दग्ध्वा ॥ संपूर्णानंद-
बोधे महतिच पुरुषं स्थापयित्वा निवृत्तं ॥ १० ॥ करितां
नित्य नामस्मरण ॥ तेणें उपजे परम पुण्य ॥ जें भोगक्षयें
नव्हे क्षीण ॥ ब्रह्म परिपूर्ण प्रापक ॥८२॥ नामस्मरतां वैरा-
ग्य पूर्ण ॥ इंद्रलोकादि ब्रह्मसदन ॥ मिथ्या देखे जैसें स्वप्न
॥ वैराग्य गहन त्या नामीं ॥८३॥ ऐसी झालिया विरक्ति॥

सद्गुरु तोचि ब्रह्ममूर्ती ॥ ऐसी उ गजे अभेद भक्ति॥सर्वांभूतीं भगवंतु ॥८४॥ अभेद गुरु भक्तीचें ज्ञान ॥ सर्वभूतीं भगवद्भजन ॥ भूत भौतिकें चैतन्यघन॥ ब्रह्मज्ञान या नावें ॥८५॥ ऐस ऐशिया ब्रह्मस्थितीं ॥जन्ममरणा सहज शांति ॥सबीज निर्दळे पैं भ्रांति॥तेही उपपत्ति अवधारा॥८६॥ प्रपंच एथें झाला होता ॥ हे समूळीं मिथ्या वार्ता ॥पुढें होईल मागुता॥ कदा कल्पांतीं घडेना ॥ ८७ ॥ ऐसी जे कां सहजस्थिति ॥ या नांव सबीज निरसे भ्रांति ॥पुरुषा परमानंद प्राप्ति ॥ हे निजख्याति अवधारा ॥८८॥ देवोनि परमानंदप्राप्ति ॥ नाम परते मागुती ॥ रामनामाच्या आवर्तीं॥ जडासी मुक्ति द्यावया॥८९॥रामनाम स्मरणासाठीं॥ परमानंदीं पडे मिठी ॥ ब्रह्मरूप प्रगटे सृष्टि ॥ आनंदकोटी

हरीनामें ॥ ९० ॥ ज्याचे नामाचें ऐसें महिमान ॥ तो स्वामी जनीं जनार्दन ॥ त्यासी कायावाचामनें ॥ अनन्य शरण सद्भावें ॥ ९१ ॥ सद्भावेंसी अनन्य शरण ॥ ऐकतांचि दीन वचन ॥ स्वयें धांविन्नला जनार्दन ॥ कृपाळु पूर्ण दीनाचा ॥ ९२ ॥ कृपा उपजली भगवंता ॥ तरी तुटली दुस्तर ममता ॥ आतां आठवतें चित्ता ॥ हरिरक्षिता कृपाळू ॥ १२४ ॥ निःशेष गेलीया मोहममता ॥ स्मरणादरू पाढिये चित्ता ॥ भजनीं आवडी भगवंता ॥ उल्हासता स्वानंदें ॥ १२६ ॥ अन्न ब्रह्म अहं ब्रह्म ॥ हृदयीं भोक्ता आत्माराम ॥ त्याचें कर्मचि परब्रह्म ॥ हें जाणती मर्म ते धन्य ॥ १२७ ॥ येन्येरविंदाक्षविमुक्तमानिनस्त्वय्यस्तभावादविशुद्धबुद्धयः ॥ आरुह्य कृच्छ्रेण परं पदं ततःपतंत्यधोनादृतयुष्मदंघ्रयः ॥ ५ ॥ तथा न ते मा-

धवतावकाःक्वचित् ॥ भ्रश्यंति मार्गान् त्वयि बद्धसौहृदः॥
त्वयाभिगुप्ता विचरंतिनिर्भयाविनायकानीकपमूर्धसुप्रभो॥
॥ ६ ॥ ( वि[२५]षय रस भोगा पुढें ॥ परमार्थ समूळ उडे॥)
देव देवपणें दाटला ॥ भक्त भावार्थें आटला ॥ परमानंदें
प्रगटला ॥ तटका तुटला आशेचा ॥४१॥भजन आवडी
भावार्थ॥भक्तें गिळिला रघूनाथ॥नामें गिळिले देवभक्त॥
मुख्य परमार्थ यानांव ॥४२॥ श्रीरामभजनीं तत्पर॥इंद्रि-
यें झालीं सुमित्र ॥ जिव्हा रामनामीं एकाग्र॥वाचा सुमि-
त्र स्वयें झाली ॥८८॥ हरिदासांचें आलिंगन ॥ ऐसें सबा-
ह्य करी पावन॥ अभागी देखती दोषगुण ॥ सभाग्य पूर्ण
सद्भावें ॥८९ ॥ संदर्शनमनुष्वंग:संलाप:परमं तपः ॥ अं-
गांगसंगः कैवल्यमहो सज्जन संगतिः ॥८५॥ॐ[२८]नमोजी

रामचंद्रा॥क्षराक्षरातीत परा॥त्रिगुणातीत चिदचिन्मात्रा॥
परात्परा परब्रम्हा॥२१॥जागृति स्वप्नीं तूर्यासुषुप्ति ॥ हनू-
मान शोधितां सीतासती॥मीतूंपणाही परती ॥सहज स्थि-
ती शोधित ॥११३॥ स्थूळ लिंग आणि कारण ॥तिहीं वे-
गळा होऊन ॥ जेथें नाहीं मीतूंपण ॥ तेथें (हनुमा ) आ-
पण प्रवेशे॥५२॥अंतरीं अद्वैत एकू ॥ बाह्य स्वधर्में पाळी
लोकू ॥ अंतरीं निजबोध चोखू ॥ वेदविवेकू बाह्य पाळी
॥५६॥ केलिया कथेचें श्रवण ॥नाहीं मनन निदिध्यास-
न ॥तरी ते कथा होय शून्य॥जेवीं मैथुन वंध्येचें॥१२६॥
काळपाश कर्मपाश ॥ धर्म पाश ब्रह्मपाश॥मायापाश मो-
हपाश ॥ जन्मपाश सातवा ॥९७॥काळपाश तो आयुष्य-
घातु॥ कर्मपाश तो नैश्वर्यवंतु॥धर्मपाश तो आश्रमवंतु॥

वेदविहितार्थु ब्रह्मपाश ॥९८॥ देहममता मोहपाश ॥मुख्य
माया तो आशापाश ॥ कनककांता हा जन्मपाश ॥ ऐसे
सप्त पाशांहीं जीव बद्ध ॥९९॥ सप्त पाशांची निवृति॥ राम
नामें करी मारुती ॥तेथें येरांची नचले युक्ति ॥ शास्त्रव्यु-
त्पत्ति शीणतां ॥१००॥ श्रीरामाचें जें नाम॥ तें केवळ प-
रब्रह्म ॥नाम निर्दळी कर्माकर्म॥धर्माधर्म छेदक॥१०१॥
कुलं पवित्रं जननी कृतार्था वसुंधरा पुण्यवतीच तेन॥अ-
पार संवित्सुखसागरेस्मिन्लीनं परब्रह्मणि चैव चेतः ॥४॥
श्रीरामासी निघाल्या शरण ॥ त्याचेनि कुळपवित्र पूर्ण ॥
त्याचेनि धरा सुखसंपन्न ॥ तीर्थ पावन त्याचेनि ॥ २५ ॥
श्रीराम कृपेचा कल्होळ॥श्रीराम शरणागता वत्सल॥श्री-
राम तो दीनदयाळ ॥ प्रेम प्रांजळ श्रीराम ॥८॥ श्रीराम

देखिल्या कृपानिधि ॥ मनाच्या जाती आधिव्याधि ॥ अहं कोहं सोहं सिद्धि ॥ याही उपाधि हरपती ॥ ९१ ॥ चित्त होय चैतन्य ॥ बुद्धि होय समाधान ॥ प्रपंच होय ब्रह्मार्पण ॥ श्रीराम दर्शन अतिश्रेष्ठ ॥ ९२ ॥ इति सुंदरकांडम् ॥

मूलग्रन्थांत या काडांत अ० ४२ ओ० ६७११ श्लोक १३८ एवं ६८४९ आहेत.

अथ युद्धकांडम् ॥ ज्यांच्या बुद्धीच्या पैं ठायीं ॥ देह देही दोन्ही न हीं ॥ कर्मबाधूत्या न बाधी कांहीं ॥ देहीं विदेही ते पुरुष ॥ २८ ॥ जेथें नाहीं पुरुष प्रकृति ॥ जेथें नाहीं शिवशक्ति ॥ लक्ष्मण राहिला ते अद्वैतीं ॥ सहज स्थितीं स्वानंदें ॥ ६५ ॥ गर्भवासाचें सांकडें ॥ अतिशयें भी दुःखगाढें ॥ रावणा तें मी (सनत्कुमार) तुज सांगेन पुढें ॥ निज निवाडें अवधारीं ॥ ३३ ॥ केवळ रजस्वलेचें रुधिर ॥ माजि पित्याचें रेतमा-

त्र ॥ तें हें विटाळाचें शरीर॥अपवित्र निंद्यत्वें ॥३४॥ माते-
चियाउदर कुहरीं॥विष्ठामुत्रांचे दाथरावरी॥जठराग्नि माझा
री॥नवमासवरी उकाडा ॥३५॥ गर्भवासांचें दुःख गाढें ॥
विष्ठालेप चहूंकडे ॥नाकीं तोंडीं रिघती किडे ॥ कोणापुढें
सांगेल॥३६॥देखोनि गर्भींची अटक ॥ जीव अनुतापें क-
री शंख॥विषयसुखें गर्भीं चें दुःख॥आक्रंदें हाक स्वयें मारी
॥३७॥विषयांपासीं जन्ममरण॥विषयें गर्भदुःख दारुण ॥
विषयसुख ते नागवण ॥ विषय तेजाण महामैंद ॥३८॥ वि-
षय देहदरीचा वाघ॥विषय विश्वासी मारक सांग॥विषय
तोचि सर्वांगें दाघ ॥विषय सांग महावैरी ॥३९॥ गर्भवासा-
पुढें देख॥ अंधतामिस्र महानर्क॥तें तंव बापुडें मशयक॥प-
रम दुःख गर्भवासीं ॥४०॥ ज्यासी श्रीराम सुप्रसन्न॥ त्या-

सीच भेटे रघुनंदन ॥ इतराचें ज्ञानध्यान॥तृणासमान श्रे-
ष्ठत्व ॥११८॥हृदयीं वैराग्य संपूर्ण॥ त्या नांव राम सुप्रस-
न्न ॥वैराग्याविण ज्ञानध्यान ॥तृणासमान श्रेष्ठत्व॥११९॥
सद्गुरुवाक्य अतिनिपुण ॥ जाणोनि देहाचें मिथ्यापण ॥ मी
आत्मा चिद्रूप परिपूर्ण ॥ मत्परायण या नांव ॥१३३॥नि-
त्य करितां भगवद्भजन ॥ संकल्प विकल्प गेले विरोन ॥
त्यासीच भेटे रघुनंदन ॥अनन्यभजन यानांव ॥१३५॥[४१]पं-
रस्वाधीन जो होय॥त्याचें कार्य कधीं न होय॥स्वयें आपण
आपली सोय॥स्वहित पाहें साधावें॥९६॥[४४]राम जगाचें जी-
वन ॥ राम जीवाचें चिद्घन॥ सखा आत्माराम आपण ॥
राम परिपूर्ण परब्रह्म ॥२ ॥ ना[४५]रायणमयं धीराः पश्यंति पर-
मार्थिनः॥जगद्धनमयंलुब्धाःकामुकाःकामिनीमयं ॥१३॥

सद्गुरूचीस्थिती ऐसी॥स्वयें अनुभवेज्या सुखासी॥तें वोपावें शिष्यासी॥न्यूनाधिकासी न करुनि॥१७४॥चित्ते मुकुंदो वदने मुकुंदो॥दृष्टौ मुकुंदः श्रवणे मुकुंदः॥एवं सदा सर्वगतोमुकुंदः॥तेमानवाः किन्नमुकुंदतुल्याः॥१॥मुखीं श्रीरामाचें नाम॥हृदयीं श्रीरामाचें प्रेम॥इंद्रियीं श्रीरामाचें कर्म॥तया दुर्गम कोण अर्थ॥१३१॥अहंकारें घालोनि घाला॥अव्यक्त व्यक्तीं आकळिला॥जीवदशेसी आणिला॥वेगीं बांधला कर्मपाशीं॥९१॥लटकेंचि क्रियमाण॥ करवून संचित जाण॥उरले ते भोग दारुण॥प्रारब्ध जाणतया ह्मणती॥९२॥या त्रिविधकर्माचे संगतीं॥पडिजेजन्ममरणावर्तीं॥भोगिजेती योनी पंक्ति॥ उसंत चित्तीं असेना॥९३॥ तें छेदावया कर्म बंधन॥सबळ भक्ति विरक्त जन॥मी ह्मणवो-

नियां भजन ॥ माझेंचि जाण करिताती॥९४॥ छेदोनियां कामक्रोधाचे बंध ॥ आणि कर्माकर्माचे भेद ॥ खाणोनि विषयाचा कंद ॥ स्वरूप शुद्ध प्रबोधिती ॥ ९८ ॥ देहमात्र झाला कृश॥त्यासी उपचारितां सुरस ॥ देवोनि अर्धमात्रा रस ॥ जन्ममरणास नासती ॥९९॥स्थूळ सांडी नश्वर ह्मणोन॥सूक्ष्म तें मनोजन्य ॥कल्पना मात्र तें कारण॥ स्वरूपाभिमान तें चौथें॥१५८॥[५४]मनें गोंविलें साधकातें॥ मनें भ्रमविलें ज्ञानीयातें ॥ मनें नाडिलें योगियातें ॥ तापसातें दंडिलें ॥८४॥(ज्याचे हृदयीं रघूनाथ ॥त्याचें भाग्य अतिसमर्थ) सच्चिदानंद आत्माराम ॥ तो श्रीराम पूर्णकाम ॥ ज्याचें सहज घेतां नाम॥उडे परम अज्ञान ॥१२३॥ त्याचें भजन तेंचि साधन॥त्याचें स्मरण तेंचि मनन ॥त्या-

चि प्राप्ति तोचि जाण ॥ ब्रह्मपूर्ण त्रि सत्य ॥१२४। श्रीराम चैतन्याचें चित्त ॥ श्रीराम आनंदाचें जीवित॥ स्फुरण रूपेंसी प्रगटत ॥ सावध करीत हनुमंता॥१३२॥श्रीराम सर्वांचा हृदयस्थ॥हृदयीं असोनि साक्षीभूत ॥ सर्वीं साक्षित्वें नांदत ॥ नव्हे लिप्त पापपुण्या ॥२२५॥

या अध्यायाची ही टीका जयरामात्मजानें केली आहे.

एक साधनीं ठकले ॥ आपमतीं सैरा भरले ॥ एक करूं करूं ह्मणतां गेले ॥ करणें राहिलें तैसेंचि॥६०॥पोटीं अनिवार विषयास्थिति ॥ज्ञान मिरवी लोकांप्रती ॥ जीविका त्यावरी करिती ॥ घात निश्चितीं स्वयेंचि केला॥६१॥जीवामाजी घालोनि जीव॥परिसतां हें अर्थ गौरव॥ तें सिद्धि पावे कार्य सर्व ॥ भवविभव निवारे ॥ ८१ ॥ असो आतां

जानकीसी ॥ मंदोदरी अति प्रीतीसी॥पुसती झाली वेगें-
सी ॥ राम अनुभवी तो कैसा॥८७॥तंव हांसोनि सीता
सुंदरी॥उत्तर देती अति कुसरी ॥ तें परिसोनि मंदोदरी ॥
विश्रांति थोरी पावली॥८८॥ सावध ऐकें साजणी ॥ प्रवे-
शतां रामानुसंधानीं॥चित्त चित्तपणा विसरोनि॥राम होवो-
नि स्वयें राहे॥८९॥ द्रष्टा परिछिन्न होये ॥ तैं दृश्य दृश्यत्वें
दिसों लाहे॥श्रीराम स्वयें तैसा नव्हे ॥ परिस माये सांगेन
॥९०॥श्रीराम होवोनि व्याप्य एक॥असतां श्रीरामें व्हावें
व्यापक ॥ त्रिपुटीचा अभावो देख ॥ व्याप्य व्यापक तेथें
कैचें॥९१॥ ह्मणसी सर्वांच्या अंतरीं॥राम असे चराचरीं॥
तो रावणाच्या शरीरीं ॥ इंद्रिय व्यापारीं वर्ततु ॥९२॥ राम
सर्वांच्या हृदयीं आहे ॥ धरितां त्या स्वहृदयस्थाची सोय॥

रामरावण कोठें आहे॥सांगपां माये यथार्थ॥९३॥भोगितां निजहृदयस्थासी॥अवकाश कैंचा भोक्त्यासी॥तेथें रावण कैंचा आणिसी॥ जे तयासी भोगावें॥९४॥दृश्याचिये भेटी ॥द्रष्टा द्रष्टेपणें नुठी ॥ होतां ते तेणेंसीं तुटी ॥ तोही शेवटीं असेना ॥९५॥ आतां नाहींपणें असे ॥ आणि असे तोचि दिसे॥ तरी रावणाचें काय पिसें॥सांग सावकाशें साजणी ॥९६॥ऐकोनी सीतेच्या उत्तरीं ॥ पूर्णावस्था मंदोदरी ॥चढला स्वेद कंप शरीरीं ॥ आनंदलहरी दाटली ॥९७॥इंद्रियां विकळता झाली ॥ चित्त चैतन्या मिठी पडली॥ अंतरीं सुखोर्मि दाटली ॥ तेणें पडली मूर्छित ॥९८॥बाप सद्गुरूचें सामर्थ्य॥अलौलिक अत्यद्भुत॥वचनमात्रें शक्तिपात ॥ झाला निश्चित मंदोदरीं ॥९९॥नं प्रतिज्ञां हि कुर्वंति वित-

थां सत्यवादिनः ॥ लक्षणं हि महत्वस्य प्रतिज्ञापरिपालनं ॥१८॥महा मोहाचें मूळ तत्वतां ॥ अहंता आणि ममता॥ तिच्या करावया घात॥सविवेकता वैराग्य॥२७॥गुरु आज्ञा पूर्ण ऐसी॥जे देहातीत आपणासी॥देखोनियां यथार्थें सी ॥ निज स्वहितासी विनटवी ॥२९॥आयुषःक्षण एकोपि नलभ्यो हेमकोटिभिः॥सचेद्विफलतां याति का हानिस्तु ततोधिका ॥२॥ स्वर्गींचे चिंतिती सुरवर ॥ कर्मभूमी नर शरीर ॥ पावतां चुके येरझार ॥ ऐसा थोर नरदेहो ॥५०॥ ऐसी नरदेहाची योग्यता ॥दुर्लभ ब्रह्मादिकां समस्तां॥तो देह पावोनी तत्वता ॥ विषयीं सर्वथा नाडलेती ॥५१॥ तथापि भगवंताचें वरद॥ हरिभक्तां न बाधी द्वंद्व॥ निरसोनि मायेचा बाध॥ स्वरूप शुद्ध भोगिती॥५४॥ (मा-

मेव ये प्रपद्यंते मायामेतां तरन्ति ते ॥ ) शिरावरी असतां
कांत ॥ ज्याची अंगना अनाथ ॥ जळो त्या पतीचें जीवित
॥ आर्तोनांदित लौकिकीं ॥१४०॥ स्त्रियांचे मोहका बोलीं
॥कोण कोणा न पडे भुली॥ सिद्ध मेळविले धुळी ॥ वि-
कल्प बोलीं स्त्रियेच्या ॥ १४६॥ रा म परमामृत पुतळा ॥
राम मुक्तीचा जिव्हाळा ॥ राम अ ंदाची कळा ॥ पाळी
लळा सकळांचा॥१३८॥भुभुं या : ब्दाचा अर्थ॥पुनःपुना
रघुनाथ ॥ अनिमिष्यें जे स्मरत ॥ ते नित्य मुक्त संसारीं
॥९०॥त्यांसी वर्ततां देह गेहीं॥सर्व रंभय अणुमात्र नाहीं
॥सकळ विषयांच्या ठायीं ॥ निर्वि य पाहीं विचरत॥९१
मूकं करोति वाचालं पंगुं लंगयते गोरिम् ॥ यत्कृपा तमहं
वंदे परमानंदमाधवम्॥१॥ आत्मा राम अहं रावण ॥ दो-

घांचें युद्ध अति दारुण ॥ अंतर्क्रियेचें विंदान ॥ सावधान परिसावें ॥ २८ ॥ महामोहाचें करोनि लाघव ॥ बंदीं घातले इंद्रादि देव ॥ सेवा घेतसे अपूर्व ॥ नित्य विषय भरडणें ॥२९॥सेविलेंचि पुनःपुन्हा जाण॥अहिर्निशी विषयसेवन ॥ दळिलेंचि पिष्ट पेषण॥निजबळें जाण करवितु॥ ॥३०॥काल भोगिलें ज्या विषयासी ॥ सर्वेचि आज आणवी ॥ त्यासी ॥ उसंत नाहीं अहर्निशीं ॥ उबग चित्तासी उपजेना ॥३१॥ दशेंद्रिय अलोलिक ॥ तेंचि रावणाचें दशमुख॥केव्हांही न पवे तृप्तिसुख॥जरी त्रैलोक्य चघळिलें ॥३२ ॥ विचित्र वासनेचें जुबाड ॥ तेचि अनिवार बाहूदंड॥कवळितां सगळें ब्रह्मांड॥नपुरे कोड दशमुखा॥३३॥ उघडी ममतेची दांताळी॥ चाटीत लोभाची अवाळी॥ वि-

कल्पाचे चाकळे चघळी ॥ सदा काळीं समसमित ॥३४॥ ओढोनि कामाचा मेढा ॥ संकल्प बाण धडपुढा ॥ विंधावया रावण गाढा ॥ श्रीराम पुढां चालिला ॥ ३५ ॥ निजहितीं कळवळा पूर्ण ॥ ज्यासी अत्यंत असेल जाण ॥ त्यांहीं सर्वांगाचे कान ॥ करोनि श्रवण करावें ॥ ३६ ॥ विचित्र संकल्पाचें अनुसंधान ॥ परिसा त्याचेंही लक्षण ॥ ममता झाली अति दारुण ॥ पाहिलें रावण वर्षला ॥५२॥ तें देखोनि रघुपति ॥ बाण सोडिला विवेक वृत्ति ॥ तेणें ममतेची केली शांति ॥ तेही स्थिति अवधारा ॥५३॥ जरी असावें दुजेपण ॥ ममता त्यासी करी कंदन ॥ चराचरीं रघुनंदन ॥ ममता पूर्ण निमाली ॥५४॥ भेटी होतां विवेक ममतेसीं ॥ वैराग्य भडका वेगेंसीं ॥ उठिला तेणें आवेशीं ॥ विषय धनुष्यासी

जाळिलें ॥५७॥ आतां कायसी रथगति ॥ह्मणोनि झाला पदाति॥सक्रोध भाला घेवोनि हातीं ॥स्वयें रघूपति हाणों आला ॥६०॥ तें देखोनियां जाण ॥ डंडळीना रघुनंदन॥ सबाह्य शांतीचें कल्याण ॥ क्रोधाचरण तेथें नचले॥६२॥ अप्राप्त कामें क्रोध उठी ॥ श्रीरामातें पाहातां दृष्टीं ॥ अ-प्राप्तीची कायसी गोष्टी ॥ पूर्ण काम सृष्टीं श्रीराम ॥६४ ॥ तेणें आवेश दशशिरीं॥मग प्रपंच कोशाभितरीं ॥ निजांगीं होती कामनासुरी ॥ तिखट भारी आशाधार ॥६५ ॥ तेणें आवेश दशशिरीं जाण॥रघुनंदन सोडी नैराश्याचा बाण॥ तेणें आशासुरी उठविली जाण ॥ कामना संपूर्ण निव-टिली॥६८॥ सर्वेचि रावणें अत्युग्र॥अविद्येचें निजशस्त्र॥ सोडियेलें वासनेचें वज्र ॥ श्रीरघूवीर दंडावया॥६९॥श्री-

राम धनुर्धारी नेटक ॥ वज्र निवटावया देख ॥निर्वासनेचें तोमर चोख ॥ एकाएक सोडिलें ॥७०॥ अंतर्बाह्य दोन्ही रणें ॥ केलीं दारुण रावणें॥तितुकीं निरसिलीं रघुनंदनें॥ अर्धक्षणें करोनियां ॥७२॥ द्वेषबुद्धीं रावण ॥ करितां श्री-रामाचें ध्यान ॥ अंतर क्षाळलें संपूर्ण ॥ झाली बोळवण कामक्रोधा॥७४॥शुद्धांतःकरणें रावण ॥ निंदेचे मिषें जाण स्तविता झाला रघूनंदन॥श्रोते सावधान परिसोत ॥७५॥ सूक्ष्म युक्ति कुशळतेसी॥ सोडोनियां वाच्यांशासी॥अंगी-कारोनि लक्षांशासी॥ श्रीरामासी बोलतु ॥७९॥ आधीं त्वंपद तो रावण॥ तें शोधोनियां जाण॥आतां तत्पद श्री-रामाचें पूर्ण ॥ स्वरूप वर्णन करीतसे ॥ ८०॥ तत्पद आ-

त्मारामीं जाण ॥ शुद्ध श्रीरामाचें वर्णन ॥ सूक्ष्म सर्वगत सनातन ॥ पावावया जाण गर्जतु ॥ ८४ ॥ तुज धरोनियां मानसीं॥बहुत निघाले साधावयासी॥शेखीं ठकवोनि तयां-सी ॥ दृश्य नव्हेसी सर्वथा ॥८५॥लपोनि त्यांच्या सर्वांगीं ॥सर्वथा न दिससी जगीं ॥ शिणतां साधनीं अनेगीं ॥तोंड वेगीं न दावसी ॥८६॥ तुजलागीं मंत्र घेती ॥ असंख्य पु-रश्चरणें करिती ॥ शेखीं तेही छळिले निश्चितीं ॥निजात्म-प्राप्ति चुकविली ॥८९॥ तैसें मजसीं नचले मत॥ मी जा-णतसें समस्त ॥मंत्रामाजी जो मंत्रार्थ॥तो तूं निश्चित श्री-रामा ॥९०॥ मंत्रीं मंत्रामाजी अक्षर ॥ ॐनमो इत्यादि उ-च्चार ॥ अक्षरीं अक्षर तूं रघूवीर ॥ हें मी साचार जाणतु ॥ ॥९१॥पाठकें छळोनियां जाण॥साधनीं लाविलें वेदपठण

॥ कोरडी वाचेची टणटण ॥ लावूनि पूर्ण गोंविलीं ॥९२॥
करितां दशग्रंथ पठण ॥ तेथेंचि छळिले संपूर्ण ॥ उदात्त
अनुदात्त स्वरित जाण ॥ वादा विचक्षण घालिती ॥९३ ॥
वेदमूळ तो ॐकार॥तेथें तुझी लपणी थोर॥ अकार मका-
र उकार॥त्रिमात्रा स्वर त्रिगुणातीत ॥९५ ॥ शास्त्र श्रवण
साधन शुद्ध ॥त्यासीही छळिलें प्रसिद्ध ॥ केलें अभिमान
विरुद्ध॥बहुविध वाद युक्तीचे॥९६॥ भोळीं बापुडीं याज्ञिकें
॥यज्ञद्वारा भरलीं एकें॥त्यांसीं गोंविलें कौतुकें॥स्वर्गसुखें
दावोनियां॥१०३॥ पुण्यक्षयें तेथोनि पडती॥ परी नैश्वर्य
न मानिती ॥ ऐसीं ठकलीं नेणों किती॥तें मजप्रति चाले-
ना॥११२॥यजमानाच्या क्रियाशक्ति॥तेचि तुझी निजस्थि-
ति॥संन्यासीही त्याच रीतीं ॥ छळणोक्तीं नाडिले ॥११४ ॥

विरजा होम करोनि एक॥ जाळिले ह्मणती कामादिक ॥
शेखीं तिळाज्य जाळिलें देख ॥ कामक्रोधादिक अनसुट
॥११५॥ आह्मीं पूज्य परमहंस ॥ह्मणोनि भुलविलें त्यांस
विसरले महावाक्यास ॥ पंचीकरणासी विसरले ॥११७॥
सांडोनि स्वानंदस्फूर्ति ॥ पूज्यत्वें भुलविले यति ॥ तैसेंचि
केलें योग्यांप्रति॥सांगूं किती कपटकर्म ॥११८॥ वारिया
वरी घालिसी ॥ नाना सिद्धींसी गोंविसी ॥ऐसा ठकवोनि-
यां लपसी॥वेडलाविसी योगियां॥१२०॥ ऐसासिंह नादें
रावण॥गर्जता झाला आपण॥तंव सारथी अति विचक्षण
॥तेणें विंदान साधिलें॥१२४॥रामें धनुष्य तोडितां जाण॥
सोहं भावाचा मेढा कठीण॥ठेविला होता आच्छादून॥तो
आणोन दीधला ॥१२५॥ सोहं भावाचा मेढा सुलक्षण॥

अनुसंधानाचा तीक्ष्णबाण॥लक्षुनियां रघुनंदन ॥स्वयें रा-
वण विंधों पाहे ॥९ ॥ तंव अवघा ब्रह्मांडगोळ॥ रामें व्या-
पिला दिसे सकळ॥तेथें कायसें जगतीतळ ॥ राम प्रबळ
वाढिन्नला ॥२॥ नेहटून पाहे जंव आपण ॥तंव निज ह-
स्तींचें धनुष्यबाण॥ तेंही झाला रघुनंदन ॥ स्वयें रावण
विस्मित ॥७७॥निज देह पाहे रावण॥हस्तपादादि अवय-
व पूर्ण॥तोही झाला रघूनंदन॥रावणपण खचों पाहे॥८३॥
अस्थि चर्म मज्जा मांस ॥रामें भेदिले सप्तकोश ॥अंतरीं
करोनि प्रवेश॥निज हृदयास शोधित ॥८४॥मनाचे संक-
ल्प सर्व॥स्वयें झाले पैं राघव॥विसरोनि निजस्वभाव॥उ-
न्मन भाव बाणला ॥८५॥ बुद्धि बोधेंसी अवचितीं ॥ राम
झाला निश्चिती॥विसरोनि निजस्फूर्ति ॥समाधिस्थिती बा-

णली ॥८६॥चित्तें चिंतितां रघुनंदन॥स्वयें झाला चैतन्य-
घन॥तेणें भयें अभिमान॥निज चिन्ह ही विसरला॥८७॥
अहंकारही कापिन्नला॥तो श्रीरामा शरण आला॥तद्रूपते-
चा कौल घेतला॥सोहं झाला श्रीराम ॥८८॥ अंतःकरणीं
व्यापकधर्म ॥धरूनि होतें प्रपंचधाम॥तेणें देखतां रघूत्तम
॥सर्वगत राम स्वयें झाला॥८९॥येरीकडे रघुनंदन॥तन्म-
याचें कोदंड जाण॥घेऊनि सायुज्याचा बाण ॥शीतीं पूर्ण
सज्जिला ॥९२॥ पूर्व कानाडी ओढोनि पाहीं ॥ बाण सो-
डितां लवलाहीं ॥ श्रीरामाच्या हस्तीं दोहीं ॥ अपूर्व कांहीं
वर्तलें ॥९३॥ आकृष्टे विधिकार्मुके रघुपतौ वामोऽब्रवी-
द्दक्षिणं ॥ पुण्ये कर्मणि भोजनेच पुरतः प्रागल्भ्यमास्मिन्न
किं ॥ वामान्यः पुनरब्रवीत्तमपि रे प्रष्टुं निजं स्वामिनं ॥

छिद्यां रावणमस्तकानि युगपच्चैकैकमादिश्यताम् ॥ १ ॥
तंव वाम बोले दक्षिणाप्रति ॥ युद्धीं भिडतां रघुपति॥मागें
सरलासी युद्धख्यातीं ॥ वीरवृत्ति हे नव्हे ॥९६॥पुण्यका-
ळ देखोनियां पुढें ॥ धांवोनि येसी लवडसवडें ॥ दान क-
रितां वाडें कोडें ॥ श्रेय निवाडें घ्यावया ॥ ९७॥ तैसेंच स-
त्कर्माच्याठायीं ॥ पुढें धांवसी लवलाहीं ॥ भोजनाच्याही
समयीं ॥ कवळ पाहीं घ्यावया ॥९८॥ आजीवरी समग्र
वित्त॥स्वामीचें भोगिलें समस्त॥ युद्ध समयीं मागें सरत॥
हें अनुचित सर्वथा ॥१०१॥ ऐकोनि वामाचें बोलणें ॥
दक्षिण हासिन्नला मनें॥निर्बळासी पुढें करणें ॥ लाजिर-
वाणें आपणासी ॥१०२॥ धनुष्य देवोनि तुजप्रति ॥ पुढें
करितांचि काकुळती ॥ येवोनि बोलसी छळणोक्ति ॥ यु-

ह्रव्यति न करवे ॥१०३॥मागें सरोनि कानासी ॥ पुसत असें गुज स्वामीसी ॥ कैसें-निवटूं रावणासी ॥ हें मज· पासीं सांगावें॥१०६॥तंव नीचाचा ऐसाची भावो॥कीं फा· टकियांत शिरवावा पावो ॥ तुवां पुढें जावोनि पाहाहो ॥ कोण आवो साधिला ॥१०८॥ऐसें निजहस्तांचें लाघव ॥ ऐकूनि सुखावे रघुराव॥तंव येरीकडे पहाहो॥अपूर्व रावणें मांडिलें॥१०९॥अध ऊर्द्ध्व दिशा समस्त ॥ कोंदला देखो- नि रघूनाथ॥बाणीं सर्वत्र पूजित ॥ तेणें हांसत सुरसिद्ध॥ ॥१२२॥सायुज्याचा निर्वाणबाण॥निजकृपेचें संधान पूर्ण ॥करोनियां रघूनंदनें ॥ कंठनाळ जाण छेदिलें॥१३६॥ राम विश्वाचा विश्वात्मा ॥ राम जीवाचा जीवात्मा ॥ राम

पराचा परमात्मा ॥ राम परमात्मा निजाचा॥१५५॥(अंथ
खलु विषम: पुराकृतानां फलतिहि जंतुषु कर्मणां विपाक:)
पतिवीण कवणेंसी रति॥पतिवीण कवणेंसी प्रीति ॥पति-
वीण नरकप्राप्ती ॥ विषय चित्तीं आठवतां ॥१५२॥ एंकी
शुद्ध सत्वात्मका॥पति चैतन्य जाणोनि देखा॥सांडून देहा-
चा आंवाका॥सायुज्य देखा साधिती ॥ ४४॥ देहं त्रिकुट
निवासी ॥ वधूनि अहं रावणासी॥मुक्त करोनि लंकेसी॥
शरणागतासी स्थापिलें॥१५५॥ यां दृष्ट्वा चित्तवैक्लव्यं स्पृ-
ष्ट्वा सत्यांशसंक्षय: ॥ संभोगे मरणं याति सा स्त्री प्रत्यक्ष
राक्षसी ॥ ५॥ जवळीं असतां पतीसी ॥ रिघोनि त्याच्या
मानसीं ॥ केव्हांची विचरे आणिकासी ॥हें कोणासी ल-
क्षेना ॥८५॥ अद्वैतीं सुख संबंधु ॥ इंद्रियांविण अगाधू॥

विषयांवीण परमानंदु॥तें स्वरूप शुद्ध तुझें स्वामी॥१२४॥
त्या निज रुपातें देखतां ॥ जरी उल्हास न बाणे चित्ता ॥
इंद्रियें नव्हे पुष्टता ॥ तरी ते वृथा पाषाणवत ॥ १२५ ॥

॥ अनृतं साहसं माया मूर्खत्वं अतिलोभता ॥
॥ अशौच्यं निर्दयत्वंच स्त्रीणां दोषाः स्वभावजाः॥१॥

पावोनियां उत्तम लोक ॥ अहं ममता भगितां तेमृत ॥पाश
वेंचे निःशेष ॥ अवश्यक भूतळा येती ॥१५३॥ लॅक्षूं जा-
तां गुणातीतता ॥ स्वयें ठसावे ते अवस्था॥लाभे आपुली
निज मुक्तता ॥ गुणातीतता गुणांगाजी ॥६ ॥जे अनिमेष
चिंतिती रामासी॥राम चिंतितु तयांसी॥स्मरणाचा माह्मा
ऐसी॥ देव भक्तासी ध्यातसे॥५१॥ जो न लागे संप्रदाया-
सी ॥ अथवा कां विषयविलासी ॥तो केवीं पावे रामासी॥

जाय निज नर्कासी निज कर्मे ॥९१॥ उग्र तपीं जो नातु-
डसी॥तो श्रवण कीर्तनापासीं ॥ सत्संगतीं पैं तिष्ठसी ॥
अहर्निशीं श्रीरामा ॥९२ ॥ स्वस्वरूपीं समाधान ॥ करी
तो मुख्य साधु पूर्ण ॥ त्या सद्गुरु परता जाण ॥साधु आन
असेना॥१०८॥निष्काम पुण्याचि जोडी ॥केल्या होती
जन्म कोडी ॥ तैं लाहिजे रोकडी ॥ निजावडी गुरुचरणीं
॥१०९॥ नाना साधनीं बहुत ॥ का काळें नव्हे प्राप्त ॥
तो गुरुदास्यास्तव एथ ॥ होय प्राप्त निजात्मा ॥ ११०॥
या कारणें भलतेंणें ॥ उठावया संसारधरणें ॥ दृढ गुरु-
दास्य करणें ॥ येर साधनें काज नाहीं ॥ ११३ ॥ मुख्य
सद्गुरु नामस्मरण ॥ मनीं गुरुमूर्तीचें ध्यान॥ श्रवणीं गुरु-
चरित्र श्रवण ॥ करीं पूजन पादसेवा॥११४॥ पायीं नित्य

प्रदिक्षण ॥ अथवा कां दर्शन गमन॥बुद्धीचा निश्चयो पूर्ण ॥ आज्ञा पालन संप्रदाय ॥ ११५ ॥गुरुमुखें तत्वता ॥वस्तु निश्चय दृढ न होतां ॥ कोटी जन्म फेरे खातां ॥न पावे सर्वथा कल्पांतीं॥२५॥ पायन्पायन्श्रुतिचुलकितं रामनामामृतं यद्ध्यायन्ध्यायन्मनसि सततं ब्रह्मतत्तारकाख्यं॥जापन्जापन्प्रकृतिविकृतौ प्राणिनां कर्णमूले॥वीथ्यांवीथ्यामटति जटिलःकोपिकाशीनिवासी ॥ १ ॥ विखं खादलीया एकदा मरे॥विषयें कोट्यानुकोटी फेरे॥भोगिताती योनीद्वारें ॥परि माघारे न सरती॥ १५॥ लक्ष्मीर्विश्वगुरोर्भार्या स्वयमालिंग्य तिष्ठति ॥ न देयंनोपभोग्यंच स एव गुरुतल्पगः॥६॥लक्ष्मी देखोनियां जाण॥जो तो करी अभिलाषण ॥ विचार न करिती पूर्ण ॥ मी कैंचा कोण हे कैंची

॥१७२॥मी जैं आलों जन्मातें॥ तैं लक्ष्मी नव्हती सांगातें ॥ देहावसानें निश्चितें ॥ मज सांगातें पैं नये ॥ १७३ ॥ भगवंतें कृपान्वित॥मज देखोंने अनाथ ॥प्रसन्न होवोनि त्वरित ॥ लक्ष्मी अद्भुत मज दिधली ॥१७४॥ श्रीरामनामेंवीण तोंड ॥ तें प्रत्यक्ष चर्मकुंड ॥माझी जिव्हा चामखंड ॥दुरापवादें काटली ॥२३९॥ श्रीरामनामाक्षरमंत्रबीजं ॥ जाप्यं मदीयं परमामृतं मे ॥ समुद्रजातं गरलं वृथा कृतं॥ ध्येयं मदीयं स तु रामचंद्र ॥ ३॥ जैसें जैसें ज्याचें प्राचीन ॥ त्यात्या कर्मानुरूप जाण ॥ फळदाता रघुनंदन ॥ स्वयें कर्तेपण त्या नाहीं ॥५१॥ हृदिरूपं मुखे नाम नैवेद्यमुदरे हरेः॥ पादोदकं च निर्माल्यं मस्तके यस्य सोऽच्युतः॥१॥ पूर्वीच विषयलोभें ठकलों॥माया मातुळें नागवलों॥श्री-

रामासी अंतरलों ॥ भोगबुद्धि करोनि ॥२२॥ महा पात-
काचें फळ दारुण॥निश्चयेंसी हेंचि जाण॥विषयगोडी पुनः
पुन्हा ॥सर्वथा मन सांडीना॥३४॥प्रेमा ह्मणजे सत्वावस्था
॥राम तिहीं गुणा परता॥गुणीं पाहातां तत्वता ॥ राम सर्व-
था भेटेना॥१०४॥विषयेंद्रिय गुणग्राम॥रहित स्वसुख आ-
राम॥तें बोलिजे श्रीराम॥सिद्धांत परम उपनिषदीं ॥११२॥
त्रिभुवनविभवहेतवेप्यकुंठस्मृति रजितात्मसुरादिभिर्विमृ-
ग्यात्॥ न चलतिभगवत्पदारविंदाल्लवनिमिषार्धमपि स वै-
ष्णवाग्र्यः॥६॥श्रीराम सोडोनि आन॥जो कां वांछी धन मा-
न॥त्यासी श्रीरामाचें ज्ञान॥सर्वथा जाण दुर्लभ ॥१६०॥
प्रेमें तेथें भाव पूर्ण ॥प्रेम तेथें वैराग्य गहन ॥ प्रेमें निरसे
जन्ममरण॥प्रेमेंवीण ज्ञान वांझोटें॥१४९॥नें काष्ठे विद्यते

देवो न पाषाणे न मृन्मये॥भावेच विद्यते देव स्तस्माद्भावो हि कारणम् ॥ १ ॥ सांडोनि मीतूंपणाची स्फूर्ति ॥ जागी न होतां चित्तवृत्ति ॥ मिठी घातली रघुनाथीं ॥ अभिनव ख्याति भरताची ॥४८॥ नुठतां मनाची स्फूर्ति॥नायकतां बुद्धीची वृत्ति ॥ निःशेष त्यागोनि अहंकृति ॥ श्रीरघुपति नमियेला ॥४९॥ हेत ठेवोनि अर्थ स्वार्थी ॥ तीर्थ व्रतादि भजन करिती ॥ ते जाणावीं अवघीं रितीं॥फळप्राप्ति तयां नव्हे ॥१०२॥ चित्तें वित्तेंसीं जीविता ॥ गुरुचरणीं पैं अर्पितां॥अति उल्हास ज्यांच्या चित्ता॥तेंचि रघुनाथाचें स्वरूप॥१०३॥उपकारिषु यःसाधुः साधुत्वे तस्य को गुणः॥ अपकारिषु यः साधुः स साधुः सद्भिरुच्यते ॥६॥ प्राण्याच्या माथां निमित्त प्राण ॥ वृथा ठेविती आबाळ जन ॥

चाळक वर्तवी वर्तन ॥ कर्मे जाण तेवीं होती ॥ ११२ ॥
*जानामि धर्मं नच मे प्रवृत्ति र्जानाम्यधर्मं नच मे निवृत्तिः॥
केनापि देवेन हृदि स्थितेन यथा नियुक्तोस्मि तथा करो-
मि ॥७॥ विसरोनिय रघुराया ॥ जे जे केलें तपश्चर्या ॥
साधनाभिमानें गिळिलें माया ॥ श्रमचि वायां वाढ-
विला॥१८॥अनिमे जें रामस्मरण॥तें उग्र तप दारुण॥
स्मरणापरतें निज साधन ॥ सर्वथा आन अना ॥१९॥
जेवीं उदकाचा निळ फेन॥तो फेन पीतां न चे तहान॥
तेवीं तुज पासोन ज हले जन ॥ ते जनीं जा न भेटसी
॥ ३ ॥ श्रीरामाचें शुद्ध ज्ञान ॥निज हृदयीं असे संपूर्ण ॥
तेथें नहोवोनि निमग्न॥वृथा अज्ञान भ्रमताती॥१०५॥वि-

* हें कैकयीचें बोलणें चाललें आहे.

षं समानं विषयो यकाराद्विषयोधिकः ॥ विषमेकाकिनं हंति विषयाश्च पुनः पुनः ॥५॥ सर्वं कर्माण्यपि सदा कुर्वाणोमद्व्यपाश्रयः ॥ मत्प्रसादादवाप्नोति शाश्वतं पद मव्ययं ॥ २ ॥भावार्थाचें सिंहासन ॥ चैतन्य मृदोलीया सुलक्षण ॥आनंदाचें ओटांगण ॥ भरता रघुनंदन अर्पितु ॥ ३२ ॥ सिंहासनीं अति सत्वर ॥ भरता बैसवी रामचंद्र ॥ तन्मयाचें धरी छत्र ॥ व्यंजन चामर बोधाचें ॥ ३२ ॥ चिद्रत्नाची नित्य दीप्ति ॥भरता उदय प्रकाशस्थिति ॥स्वयें अर्पिली रघुपति ॥ अगाध स्थिती भाग्याची ॥३४ ॥ रांम परंज्योति अमळ ॥राम परंधाम सोज्वळ॥ राम अद्वयानंद केवळ॥ नलगे मळ तयासी ॥७९ ॥ ॥ इति युद्धकाडम् ॥

मूळ ग्रंथांत या कांडांत अ.९२ श्लोक १७११ व ओव्या १२९७९ आहेत.

अथ उत्तरकांडम्॥ शरीर असे प्रारब्धाधीन ॥ सुखदुःख भोगी प्रारब्धें करून ॥ ब्रह्मादिकां न सुटे जाण ॥ प्रारब्ध पूर्ण बळिवंत॥६२॥अच्युत नाम जयाचे वाक्पुटीं॥ तयासी विषयासी पडे तुटी ॥ संसाराचें धरणें उठी ॥ परब्रह्म भेटी पैं होय॥८४॥पतिवचनीं निजरत ॥ तेचि पतिव्रता निश्चित॥पतिवचनीं उदासभूत॥ ते जाण निश्चित समवेश्या॥११॥तप करोनि तापस ॥ शांतीचा नाहीं लवलेश॥ वृथा दंड मुंडवेष॥परान्नास सं कले॥२५॥तूं वेदाकाशींचा चिद्घन॥तूं योगियां मानसीं चैतन्न॥तूं सुखसागरींचें सुधापान ॥ तूं निजजीवन संतांचें ॥११॥ श्रीराम तूं आदीचा अनादी॥तूं मोक्षाची मोक्षसिद्धि॥तूं निधीची परम निधि॥ समाधि श्रीरामा॥१२॥तूं तपचें परम तप॥तूं भक्तांचा पर-

म दीप॥तूं सदाशिव हृदयींचा जप॥तूं सुखस्वरूप सर्वांचें॥
॥१३॥ध्येय ध्याता आणि ध्यान॥तयाहूनि असमी भिन्न॥
सच्चिदानंद हें असतें जाण ॥ तूं परेहून परात्परु॥१४॥नों[15]-
शिवंत हा संसार ॥जाणोनि न करी भजन सार॥मूढ बुद्धि
हा पामर ॥ नरक घोर तो भोगी॥३३॥जे[24] संसारबांदवडीं
पडिले॥जे मी माझें ह्मणत गेले॥जे विधिनिषेधीं नाडिले॥
जे पडिले काळचक्रीं॥१३॥माझी स्त्री माझे पुत्र ॥ माझें
धन माझें गोत ॥ जयांचें भ्रांत झालें चित्त॥तयां ग्रासिलें
कळीकाळें॥१४॥गो[41]कोटिदानं ग्रहणेषु काशी प्रयागगंगा-
युतकल्पवासः ॥ यज्ञायुतं मेरुसुवर्णदानं गोविंद नाम-
स्मरणेन तुल्यं ॥१॥ [52]तुझिया चरणाचेनि दर्शनें॥उठे सं-
साराचें धरणें॥अहंममतेचें खत फाटणें ॥वेगीं पावणें पर-

ब्रह्म ॥१४॥ गृह स्त्री पुत्र धन॥यांची आसक्ति ज्ञानीयासी
नाहीं जाण ॥ भोग भोगून अभोक्ता पूर्ण ॥ वैराग्य मन
दृढ ज्याचें ॥१७॥ जो प्राणी जन्मा आला ॥ तो गर्भींच
जाण मेला॥याकारणें साधुमेळा ॥ निःसंग होऊनि राहा-
तसे ॥१९॥भलतेनें आपुलें करावें हित ॥ न करावें वृथा
जीवित॥आयुष्य जाऊं न द्यावें व्यर्थ ॥सावचित्त होवोनि
॥२०॥संसार ह्मणजे गंधर्वजाळ॥विचारितां दिसे मृगज-
ळ ॥ जैसें हें कां वंध्येचें बाळ ॥काय कोठें भेटलें॥२६॥
(रामा)तुजवीण विषयभोग ॥ तोचि प्राणियासी क्षयरोग॥
जे तुजसी विमुख करिती भोग॥तोचि रोग तयांसी॥१७॥
॥ इति उत्तर कांडम् ॥ ॐतत्सत्कृष्णार्पणमस्तु ॥ ॥
अध्याय ७७ ओ. ९३२६ श्लोक ८४ एवं ५४१०. एवं सर्व ग्रंथांत अ. २९७ ओव्या
३६३२९ श्लोक २००० एवं ३९३२९.

## विशिष्ट वर्गणिदारांचीं नांवें.

नामदार रा. सा. काशिनाथपंत त्रिंबक तेलंग, सी. आय. ई.

राय बहादूर लक्ष्मणसिंग जोवासिंग, सुपरिंटेंडंट्, रेल्वे मेल सर्विस, मुंबई.

रा० रा० तुकाराम लक्ष्मू कुर्लेकर, हेडक्लार्क, सा. डि. मुंबई जनरल पोष्ट ऑफिस.

रा० रा० गोविंदराव आपाजीराव जाधव, बेळगांवचे इनामदार व जाइंट हेडक्लार्क रेजिस्ट्रेशन शाखा मुम्बई ज. पोष्ट.

रा. रा. आत्माराम अनंत गांवसकर. रेकर्डक्लार्क, रे. मे. स. मुंबई.

रा. रा. सदाशिव ढो० साथए, हेडमेल ऑफिसर, फा. मे. मुंबई.

रा. रा. मोरेश्वर हरिश्चंद्र जोशी.

रा. रा. आत्माराम यशवंत तेली.

रा. रा. सखाराम महादेव खेडकर.

रा. रा. नारायण गोविंद.

रा. रा. हरी रामचंद्र.

रा. रा. परशराम नारायण.

रा. रा. बाळकृष्ण रामचंद्र कडेगांवकर.

रा. रा. लक्ष्मण बाबाजी लाड.

रा. रा. धोंडू सखाराम.

☞ रा. रा. सदाशिवराव रामचंद्र मुळगांवकर यांनीं आपला ग्रंथ उदार बुद्धीनें हवे तितके दिवस वाचण्यास दिल्याबद्दल त्यांचे आह्मीं आभार एथेंच कृतज्ञतापूर्वक मानतों.

शं. बा. म.

ए०भा०
॥४०॥
REFBK-0019509
रा०सा०
मराठी ग्रंथ संग्रहालय मुंबई
ग्रा. क्र. १९७०९

विक्रीस तयार.

# संसार दृष्टी.

यांत पुढील विषयांवर मनोरंजक निबंध आहेत.

| | |
|---|---|
| १ प्र... ...तव्यकर्म-स्वधर्म. | ४ सद्उद्योग, |
| २ सदाचरण--दुराचरण. | ५ खरा मोठेपणा-(स्त्रीशिक्षण). |
| ३ बालवर्तन-शिक्षण. | ६ स्वहित संबंधीं अनुभविक परिणाम. |

व नंतर एक संसारदृष्टि नामक स्वदेश हितचिंतकाची चटकदार सुरस गोष्ट आहे. किंमत ४॥ आणे. हीं दोन्ही पुस्तकें आह्मांकडे मिळतील. एकदम १० प्रती घेणारास कमिशन मिळेल.

शंकर बालकृष्ण महाडेश्वर.

मोरोबा पोपटजीची वाडी, घर नंबर २७ मुंबई.

॥४०॥

---

मुंबई:—आर्यन् ट्राक्ट आणि बुकडिपो प्रिंटिंग प्रेस.